सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १९९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पाचेगाव येथील शाळा व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड



पाचेगाव – येथील जि.प उच्च प्राथमिक शाळेत दिनांक ९ ऑक्टोंबर रोजी,शाळा व्यवस्थापन समिती गठीत करण्यासाठी मुख्याध्यापक एस.एस.धनवे यांच्या मार्गदर्शनाखाली पालक सभा आयोजित करण्यात आली होती. पालक सभेत,सर्वानुमते सर्व सदस्य,अध्यक्ष व उपाध्यक्ष बिनविरोध निवडल्या गेले. अध्यक्षपदी अशोक जनार्दन छपरे यांची तर उपाध्यक्षपदी गौकर्णा प्रभाकर तळेकर यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून दीक्षा बहिरट, सतिष सोळंके, सुनिता घोडे,अनिल तळेकर,शेषराव घोडे,गंगा खटिंग,सोनाली ससे, सचिव श्री एस.एस. धनवे, नवनिर्वाचित सर्व पदाधिकारी सदस्य यांचे शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी गावातील सर्व पालक ,शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंदानी परिश्रम घेतले.

## कै.बाबुरावजी काळे मराठी स्कुल च्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरावर धावणे या स्पर्धेत यश



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१० ऑक्टोबर

जिल्हास्तरावरील धावणे या स्पर्धेत की राजश्री मिसाळ हिने ४०० मीटर व ओम परेराव याने २०० मीटर धावुन जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक पटकावला या दोन्ही विद्यार्थ्यांचे शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा ज्योतीताई काळे,संस्थेच्या संचालिका सुनयना काळे यांनी या विद्यार्थ्यांना शाल,श्रीफळ व भेटवस्तु देवुन सत्कार करण्यात आला.यावेळी संस्था प्रतिनिधी प्रा.कमलेश काळे, ज्ञानज्योती शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश यादव,प्राचार्य डॉ.शिरिष पवार,प्राध्यापक डॉ.दादासाहेब पवार शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,सागर घाटे, क्रीडा शिक्षक संदिप निकम व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## गाणे गाण्याची मिळाली सुवर्णसंधी

शो 'सारेगमप' सुरू झाल्यापासून अवघ्या चार आठवड्यांमध्ये उभारता सितारा रूपेश मिश्राला मोठा ब्रेकथ्रू मिळाला आहे. राजकुमार राव व तृप्ती दिमरी अभिनीत आगामी चित्रपट 'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ'मधील 'चुम्मा' गाणे गाण्यासाठी तो पार्श्वगायक बनला आहे. शोमध्ये रूपेशचा प्रवास पाहिलेल्या प्रेक्षकांसाठी ही असाधारण संधी सरप्राइज नाही, जेथे त्याचे टॅलेंट, अथक मेहनत व पॅशनचे शोमधील प्रख्यात मेन्टोर्स सचिन आणि जिगर यांनी सतत कौतुक केले आहे. या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक सचिन व जिगर यांनी रूपेशला नवीन गाण्यासाठी त्याचा आवाज देण्याची ही सुवर्णसंधी दिली, ज्यामुळे त्याचे टॅलेंट व समर्पिततेला बहुमान मिळाला आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

पु. ता. २२/११/२४

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं... १५१/२०२४

१. जमुनाबाई बालचंद चव्हाण, वय ७२ वर्ष, धंदा घरकाम, रा. नांदगाव तांडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर २. श्रावण बालचंद चव्हाण, वय ५२ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. वर्जन बालचंद चव्हाण, वय ४७ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बावत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणे करिता अर्ज दाखल केलेला आहे. मयत बालचंद फुला चव्हाण यांचा दिनांक ११.०५.२०२१ रोजी मौजे नांदगाव तांडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत बालचंद फुला चव्हाण यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ८/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

आदेशावरुन,

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

### जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/भशाका/जमाबंदी–१/जन्म–मृत्यु नोंद/सिआर–६०३

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २७/०९/२०२४

अर्जदार : हिराबाई नारायण सोनगिरे रा. पिशोर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय पिशोर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :– जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०२–०६–१९९२ रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०२–०६–१९९२ रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०२–०६–१९९२ रोजी पिशोर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २०–११–२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०२–०६–१९९२ रोजी पिशोर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक २७/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

# भूमी अभिलेख कार्यालयाकडून अधिकारांचा गैरवापर

## आदेश नसतानाही विनापरवानाच बांधकाम पाडले

**करजखेडा ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ता. २४ सप्टेंबर रोजी गट नं. ४६ ची मोजणी करण्याबाबत आदेश काढण्यात आले होते. त्यानुसार ता.३० सप्टेंबर रोजी कार्यालयाकडून मोजणी करण्यात आली. केवळ हद्दीखुणा निश्चित करण्याचा आमचा आदेश असताना पाटबंधारे विभाग जालना येथील सेवानिवृत्त कर्मचारी होगे यांनी संबंधित मंगल कार्यालयाची का भिंत पाडली? याबाबत आपणास कोणतीही माहिती नसल्याची प्रतिक्रिया भूमी अभिलेख कार्यालयाचे उपअधीक्षक के. एच. परदेशी यांनी दिली आहे.**

सेलू, (प्रतिनिधी) ) : तालुक्यातील वाकी येथील गट न. ४६ ची मोजणी करून हद्दीखुणा निश्चित करण्याच्या केवळ सूचना असताना अधिकाराचा गैरवापर करून भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकाऱ्यांनी गट नं. ४४ व ४५ मध्ये असलेले अधिकृत बांधकामाची संरक्षण भिंत जेसीबीच्या साह्याने पाडली. यात दोन लाखापेक्षा जास्त रकमेचे नुकसान केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी साई मंगल कार्यालयाच्या मालकांनी पोलिसांकडे केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, आरती लहेरचंद खोना व पवन हेमंतराव आढळकर यांची वाकी शिवारात गट न.४४ व ४५ मध्ये स्वतःच्या मालकीची जमीन आहे. सदर जमिनीवर प्लॉट टाकते वेळी २००९ मध्ये आरती खोना व पवन आढळकर यांनी या जागेची मोजणी भूमी अभिलेख कार्यालया मार्फत करून घेतली होती. तसेच संबंधित सर्वे नंबरचा जिल्हाधिकारी परभणी व तहसीलदार शेलु यांनी रीतसर लेआउट मंजूरही केला. यातील काही प्लॉट् त्यांनी साई मंगल कार्यालयाचे मालक बालाजी दत्तात्रेय पंपटवार व इतर भागीदार यांना विक्री केले. त्यानंतर मौजे वाकी ग्रामपंचायतीने साई मंगल कार्यालयास सन २०१२ मध्ये बांधकामाचा रीतसर परवाना दिल्यानंतर साई मंगल कार्यालय बांधण्यात आले.

परंतु करसखेडा येथील पुनर्वशीत गावठाणसाठी दहन व दफनभूमी, बस स्थानक थांबा यासाठी गट नंबर ४६ मधील जमीन अधिग्रहित असल्याच्या तक्रारी नंतर (ता. ३०) सप्टेंबर रोजी भूमी अभिलेख कार्यालय व जायकवाडी पाटबंधारे विभाग यांच्यामार्फत मोजणी करण्यात आली. गावठाण जमिनीची हद्द गट नं. ४४/४५ मध्ये येत असल्याचे भासवून मोजणीदार हुगे व इतर अधिकाऱ्यांनी मनासारख्या हद्दी खुणा टाकून अधिकाराचा गैरवापर केला. चुकीच्या पद्धतीने झालेल्या मोजणीत आरती खोना व हेमंत आढळकर यांचे प्लॉटही अतिक्रमनात असल्याचे भासविण्यात आलेत. तसेच विनापरवाना मंगल कार्यालयाची पूर्व बाजूची संरक्षण भिंत जेसीबीच्या साह्याने तोडली. या प्रकरणात दोन लाखापेक्षा जास्त रक्कमेचे नुकसान केल्याप्रकरणी मोजणी अधिकारी होगे व इतर कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी साई मंगल कार्यालयाचे संचालक बालाजी पंपटवार व इतर भागीदार यांनी पोलिसांकडे केली आहे. मोजणी करतेवेळी संबंधित जागा मालकांस उपस्थित राहण्याबाबतच्या कोणत्याही पूर्व सूचना देण्यात आल्या नव्हत्या हे विशेष.

## आनंदाचा शिधा लाभार्थ्यांना त्वरित द्यावा : सुरेखा शेवाळे टाले



जिंतूर : तालुक्यात ९००० लाभार्थी आनंदाच्या शिधापासून वंचित तालुक्यातील राशन कार्ड धारकांना शासनाच्या वतीने आनंदाचा शिधा शंभर रुपयांमध्ये पाच वस्तू मोफत मिळणार असल्याचा मोठा गाजावाजा करून आनंदाचा शिधा ८५ टक्केच प्राप्त झाल्याने एकूण जिंतूर तालुक्यातील ९००० राशन कार्ड धारकांना या शिद्या पासून वंचित राहावे लागले आहे. यामुळे कार्डधारकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

गोरगरीब नागरिकांना सण उत्सव आनंदाने साजरे करण्यासाठी शासनाच्या वतीने साखर, तेल पुडा, चनाडाळ, रवा प्रत्येकी एक किलो इत्यादी वस्तू १०० रुपयांमध्ये दिल्या जात असल्याने अनेक नागरिकांनी राशन दुकानावर मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. परंतु शासनाच्या वतीने पुरवठा कमी करण्यात आल्यामुळे अनेक नागरिकांना आल्या पावली परत जावे लागले.

जिंतूर तालुक्यात जिंतूर विभागांतर्गत १२७ स्वस्त धान्य दुकानदार आहेत. तर बोरी विभागांतर्गत ७७ दुकानदार आहेत. एकूण २०४ दुकानदार असून शासनाच्या वतीने जिंतूर अंतर्गत ३५१४५ किट पाहिजे होत्या. परंतु ३००४८ किट मिळाल्या आहेत. बोरी विभागांतर्गत २०८१३ किट पाहिजे होत्या. परंतु २५७९५ किट मिळाल्या एकूण जवळपास ९००० किट कमी मिळाल्याने ९००० राशन कार्ड धारकांना या आनंदाच्या शिध्यापासून महत्त्वाच्या सणाला वाटप न केल्यामुळे वंचित रहावे लागलेच आहे. परंतु आता आनंदाचा सीधा महसूल विभागाच्या वतीने वाटप करण्यात आला आहे .परंतु अनेक लाभार्थ्यांना लाभ न मिळाल्यामुळे नागरिकांच्या वतीने शासनाचा जाहीर निषेध केला जात आहे. **जिंतूर तालुक्यात प्राप्त झालेल्या आनंदाच्या**

### शासनाच्या वतीने ८५.५० किट प्राप्त झाले

**गोरगरीब जनतेला लवकरात लवकर शासनाने जाहीर केलेल्या किट ह्या गणपती व महालक्ष्मी सना करता देण्यात येतील असे जाहीर केले होते परंतु गणपती गेल्या महालक्ष्मी गेल्या दसरा दिवाळी आली तरीही नागरिकांना अन्नसुरक्षा किट आजपर्यंत मिळाल्या नाहीत तरी त्यांना लवकरात लवकर मिळवून देण्याची कृपा करावी अशा मागणीचे निवेदन सुरेखा शेवाळे टाले शिवसेना उभाटा गटाच्या परभणी जिल्हा महिला संघटक यांनी परभणीचे जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात आले आहे.**

**शिधा किट :** जिंतूर विभागांतर्गत –अंतोदय कार्डधारक संख्या ३७६५ –अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत २२९०६ –शेतकरी कार्ड धारक संख्या ३३७७ एकूण ३००४८ – लाभार्थी ३५१४५ बोरी विभागांतर्गत प्राप्त किट –अंतोदय लाभार्थी १५१७ – अन्नसुरक्षा लाभार्थी १३६४९ –शेतकरी लाभार्थी २६२९ एकूण प्राप्त १७७९५ एकूण लाभार्थी २०८१३

## कुलस्वामिनी प्रतिष्ठान गणेश मंडळास जिल्ह्यातून प्रथम पारितोषिक प्रदान



तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर –

या वर्षी शासन तर्फे राज्यस्तरावर सार्वजनिक गणेश मंडळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.राज्यांतून जवळपास ११०० गणेश मंडळांनी या स्पर्धा मधे भाग घेतला आहे.

कुलस्वामिनी प्रतिष्ठान गणेश मंडळास या वर्षी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले. हे पारितोषिक मुंबई येथील यशवंत नाट्यगृह,माटुंगा मुंबई येथे आज दि.९ ऑक्टोबर रोजी प्रदान करण्यात आले. हे पारितोषिक मा.ना.सुधीरभाऊ मुनगिटवार (मंत्री सांस्कृतिक विभाग)व विकास खारगे (मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव ) मिनल जोगळेकर,यांचे शुभ हस्ते कुलस्वामिनी प्रतिष्ठान चे अध्यक्ष विलास कोरडे व उपाध्यक्ष अविराज कोरडे यांना प्रशस्तिपत्र,रु२५००० व ट्रॉफी देऊन करण्यात आले. मंडळातर्फे प्रत्येक वर्षी सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम वर्षभर घेण्यात येऊन लोकोपयोगी संदेश दिल्या जातात. या वर्षी मंडळातर्फे भारत गणेशा व ४००० पोस्ट कार्ड्स वर चितारलेले गणेश प्रदर्शन याचा सुंदर देखावा केलेला होता.

पोस्ट कार्ड ने सजवलेले वाहन मुंबई येथे मंत्री महोदय व पाहुण्याना दाखवण्याकरिता नेण्यात आले. मा ना सुधीरभाऊ यांनी मंडळाच्या भारत गणेश देखावाचे व या वाहनचे विशेष कौतुक केले. मंडळाचे सचिव सौ अलका कोरडे,चंद्रमुनी जायभाय,अनिल गावंडे,प्रल्हाद गायकवाड,ज्ञानेश्वर सागरे,मजहर मंडी,संजय राठोड,नावकर राहुल हे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

## पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही तरीही निवडणुक लढवणार

### सुरेश नागरे यांची पत्रकार परिषदत माहिती



सेलु:राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडुन जिंतूर सेलू विधान सभेची जागा सोडवुण घेण्यासाठी वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू असून पक्षाने उमेदवारी दिली नाही तरी निवडणुकीतून माघार घेणार नसल्याची माहिती राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेश सचिव सुरेश नागरे यांनी मंगळवार ८ रोजी पत्रकार परिषदेत दिली.यावेळी नानासाहेब राऊत,कमल लोखंडे,गणेश नाईकवाडे,रहिम पठाण,भागवत जोगदंड आदींची उपस्थिती होती.पूढे बोलतांना म्हणाले की मागील अनेक वर्षापासुन विकासाचे व्हिजन मतदार संघ हारवुन बसला आहे,लोकप्रतिनिधी केवळ टक्केवारी खात असल्याने विकासकामांना खिळ बसली आहे सेलू तालुक्याचे विकासाचे अनेक प्रलंबित आहेत मात्र लोकप्रतिनिधीना त्या प्रलंबित प्रश्ना बद्दल काही एक देणे घेणे नाही.मागील अनेक वर्षापासून निवडुन आलेल्या लोकप्रतिनिधींनी केवळ आपली घरे भरण्याचे काम केले आसल्याचे ही यावेळी स्पष्ट केले.येणा–या काळात मतदार संघाचा विकास हेच व्हिजन राहणार असुन त्या पद्धतीने काम करणार असल्याचे ही यावेळी त्यांनी सांगीतले.यावेळी पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

## पुर्णा येथील पुरवठा निरीक्षण अधिकारी म्हणून सतीश नाईक यांची नेमणूक



पूर्णा,प्रतिनिधी : येथील तहसील कार्यालयात पुरवठा निरीक्षण अधिकारी म्हणून सतीश नाईक यांची नेमणूक झाली असून त्यांनी या आपल्या पदाचा कार्यभार नुकताच स्वीकारला आहे. यापूर्वी ते नागपूर येथे कार्यरत होते. शासनाने आता प्रत्येक तहसील कार्यालयात स्वतंत्र अधिकारी अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक केली असून पूर्णा तहसील कार्यालयात पुर्णेचे नवीन पुरवठा निरीक्षण अधिकारी म्हणून सतीश नाईक यांनी पदभार स्वीकारला आहे. त्यांचे कर्मचाऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यापूर्वी पुरवठा विभाग महसूल विभागाच्या नायाब तहसीलदार कडे होता, परंतु आता शासनाने या जागेवर स्वतंत्र पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे.

## नेहरु युवा केंद्रातर्फे निबंध प्रतियोगितेचे आयोजन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १० ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त माय भारत अंतर्गत नेहरू युवा केंद्र छत्रपती संभाजी नगर व शिवसेवा बहुद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने एच. पी. एल. माध्यमिक विद्यालय कृष्णापुर येथे निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. हा संपूर्ण कार्यक्रम जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला सर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.आपल्या जीवनातील स्वच्छतेचे महत्व' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. एकूण ८० विद्यार्थ्यांनी या निबंध स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे मुख्याध्यापक संभाजी जाधव व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व कळावे हा प्रमुख उद्दिष्टे या कार्यक्रमाचा होता. स्वच्छता ही एक सेवा असून, आपल्या देशासाठी आपल्या जीवनात स्वच्छतेची नितांत गरज आहे. घाणीचा आपल्या सभोवतालच्या वातावरणावर आणि जीवनावर परिणाम होतो. आपण वैयक्तिक आणि सभोवतालची स्वच्छता ठेवली पाहिजे आणि इतरांनाही ते करण्यास प्रेरित केले पाहिजे. स्वच्छता राखण्यासाठी इकडे तिकडे कचरा टाकू नये कचरा नेहमी डजबींमध्ये टाकावा स्वच्छतेत देवाचा वास असतो असे राष्ट्रीय युवा समन्वयक पंकज धुळे म्हणाले.

उत्कृष्ट निबंध लिहिणाऱ्या दहा विद्यार्थ्यांना मेरा युवा भारत ( चधइहरीरीं ) डायरी, टोपी आणि पेन देऊन त्यांना प्रोत्साहित केले.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी राष्ट्रीय युवा समन्वयक पंकज धुळे, राजकुमार बोरुल सर, संकेत मोरे, गौरव पंडित अभिषेक काकडे, आशिष जाधव, वैभव जाधव, तन्मय हरिहर, राहुल ठोंबरे, अष्टांग पंडित व आकांक्षा धुळे यांनी परिश्रम घेतले.

# ११ ऑक्टोबरपासून स्टार प्रवाहवर सुरु होतेय नवी पौराणिक मालिका उदे गं अंबे कथा साडे तीन शक्तिपीठांची

### मालिकेच्या सेटवर गोंधळाचं आयोजन करुन संपूर्ण टीमने देवीला घातलं साकडं




विठुमाऊली आणि दख्खनचा राजा जोतिबाच्या यशानंतर स्टार प्रवाह वाहिनी प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार आहे नवी पौराणिक मालिका 'उदे गं अंबे... कथा साडेतीन शक्तिपीठांची'. देवी आदिशक्तीची साडेतीन शक्तिपीठं ही महाराष्ट्रवासियांची असीम श्रद्धास्थानं. महाराष्ट्रातल्या प्रत्येक घरात साडेतीन शक्तिपीठांपैकी कुठल्या ना कुठल्या देवीचं कुलदेवता म्हणून पूजन केलं जातं. ही आदिशक्ती आईप्रमाणे कुटुंबाचं रक्षण करते. पण आपल्या कुटुंबासाठी पूजनीय असलेल्या या आईसमान देवीचं महात्म्य आणि इतिहास सर्वांना माहित असतोच असं नाही. तो इतिहास सविस्तरपणे आणि रोचक पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न उदे गं अंबे... कथा साडेतीन शक्तिपीठांची या भव्यदिव्य पौराणिक मालिकेतून करण्यात येणार आहे. ११ ऑक्टोबरपासून सायंकाळी ६.३० वाजता ही महामालिका प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. कोणत्याही शुभकार्याच्या प्रसंगी देवीचा गोंधळ घालण्याची प्रथा आहे. याच निमित्ताने सेटवर गोंधळाचं आयोजन करुन मालिकेच्या संपूर्ण टीमने देवीला साकडं घातलं.

या महामालिकेविषयी सांगताना स्टार प्रवाहचे व्यवसाय प्रमुख सतीश राजवाडे म्हणाले, 'साडे तीन शक्तिपीठे आपली श्रद्धास्थानं आहेत. ही फक्त देवी नाही तर आई आहे सगळ्यांची. अश्या देवी आईची कथा सादर करताना कृतज्ञता वाटतेय. मोठी जबाबदारी आहे. तिन्हीसांजेला देवी आई घरात येईल आणि संपूर्ण महाराष्ट्राला आशीर्वाद देईल. नव्या पीढीला या शक्तिपीठांची माहिती मिळेल आणि घरबसल्या भक्तांना एका यात्रेचा अनुभव मिळेल. आपली परंपरा जोपासण्याचा स्टार प्रवाह वाहिनीचा नेहमीच प्रयत्न असतो. ही मालिकाही अशीच संस्कार मूल्य आणि करमणुकीची सांगड बांधून सादर केली जाईल.'

साडेतीन शक्तिपीठांचा महिमा जाणून घेण्यासाठी मुळात त्यांची निर्मिती कशी झाली हे समजून घेणं गरजेचं आहे आणि म्हणूनच शक्तिरूप असलेल्या देवी सती आणि शिवशंकराच्या कथेपासून या मालिकेची सुरुवात होईल. सुप्रसिद्ध अभिनेता देवदत्त नागे या मालिकेत भगवान शिवशंकर साकारणार आहे. या मालिकेच्या निमित्ताने जवळपास १० वर्षांनंतर तो स्टार प्रवाहच्या मालिकेत झळकणार आहे. उदे गं अंबे कथा साडेतीन शक्तीपीठांची या मालिकेतल्या भूमिकेविषयी सांगताना देवदत्त नागे म्हणाले, 'टीव्ही माझं अत्यंत आवडीचं माध्यम आहे. कारण टीव्हीच्या माध्यमातून तुम्ही प्रेक्षकांच्या फक्त घरात नाही तर मनात देखिल पोहोचता. स्टार प्रवाहच्या देवयानी मालिकेने मला अभिनेता म्हणून ओळख दिली. जवळपास १० वर्षांनंतर मी पुन्हा एकदा स्टार प्रवाहसोबत काम करतोय. प्रेक्षकांपर्यंत मालिकेच्या निमित्ताने साडेतीन शक्तीपीठांची गोष्ट पोहोचवण्याची संधी मिळत आहे हे मी माझं भाग्य समजतो. शिव–शक्तीचं नातं अतूट आहे. जिथे शिव आहे तिथे शक्ती आहे. त्यामुळे साडे–तीन शक्तीपीठींच्या या गोष्टीमध्ये शिवशंकराचे नेमके कोणते अवतार होते आणि त्यामागे नेमकी कोणती कथा दडली आहे हे या मालिकेतून साकारण्याचा प्रयत्न असेल. महादेवांपुढे श्रद्धेने लीन होऊन या नव्या प्रोजेक्टची सुरुवात करतोय. प्रेक्षकांचा आशीर्वाद आणि प्रेम दोन्ही मिळावं हीच अपेक्षा आहे.'

या भव्यदिव्य मालिकेत आदिशक्तीची रुपं साकारणार आहे अभिनेत्री मयुरी कापडणे. मयुरीची देवीवर प्रचंड श्रद्धा आहे. योगायोगाने कोल्हापुरच्या अंबाबाईचं दर्शन घेत असतानाच मयुरीला आदिशक्तीचं रुप साकारण्यासाठी विचारणा झाली. हा दैवी अनुभव असल्याची भावना मयुरीने व्यक्त केली. मी पहिल्यांदाच पौराणिक मालिकेत काम करतेय. सगळ्यात महत्त्वाचं माहुरची देवी रेणुका, कोल्हापुरची देवी अंबाबाई, तुळजापुरची देवी भवानी, वणीची देवी सप्तशृंगी, सती, पार्वती ही देवीची वेगवेगळी रुपं मी साकारणार आहे. मी जेव्हा स्वत:ला देवीच्या रुपांमध्ये पाहिलं तेव्हा माझाच माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. हा देवीचाच आशीर्वाद आहे असं मला वाटतं अशी भावना मयुरी कापडणेने व्यक्त केली.

स्टार प्रवाह प्रस्तुत या भव्यदिव्य मालिकेची निर्मिती महेश कोठारे यांच्या कोठारे व्हिजन प्रायव्हेट लिमिटेड या निर्मिती संस्थेने केली आहे. याप्रसंगी महेश कोठारे म्हणाले, 'स्टार प्रवाहसोबत खूप जुने ऋणानुबंध आहेत. मन उधाण वाऱ्याचे ही पहिली मालिका स्टार प्रवाहसोबत केली होती. त्यानंतर विठुमाऊली, दख्खनचा राजा जोतिबा, पिंकीचा विजय असो, सुख म्हणजे नक्की काय असतं अश्या सुपरहिट मालिका केल्या. उदे गं अबे...कथा साडेतीन शक्तिपीठांची या महामालिकेतून महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचा महिमा उलगडण्यात येणार आहे. ही मालिकाही भव्यदिव्य असेल यात शंका नाही.' तेव्हा पाहायला विसरु नका नवी पौराणिक मालिका उदे गं अंबे कथा साडे तीन शक्तिपीठांची ११ ऑक्टोबरपासून सायंकाळी ६.३० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १९९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## सॅमसंगकडून 'सॉल्व्ह फॉर टूमारो २०२४'च्या विजेत्यांची घोषणा

छत्रपती संभाजीनगर – सॅमसंग इंडियाने त्यांची प्रमुख तरूण शिक्षण व इनोव्हेशन स्पर्धा 'सॉल्व्ह फॉर टूमारो' २०२४ च्या तिसऱ्या पर्वासाठी विजेत्या टीम्स – इको टेक इनोव्हेटर आणि मेटल यांची घोषणा केली. गोलाघाट, आसाम येथील इको टेक इनोव्हेटरला स्कूल ट्रॅकमध्ये कम्युनिटी चॅम्पियन म्हणून घोषित करण्यात आले, तर उडुपी, कर्नाटक येथील मेटलला युथ ट्रॅकमध्ये एन्व्हारोन्मेंट चॅम्पियन म्हणून घोषित करण्यात आले. यामधून भारतातील प्रमुख शहरांबाहेर या उपक्रमाची पोहोच दिसून आली.शुद्ध पिण्यायोग्य पाणी समान उपलब्ध होण्यासंदर्भात संकल्पना विकसित केलेल्या इको टेक इनोव्हेटरला प्रोटोटाइप सुधारणेसाठी २५ लाख रूपयांचे सीड अनुदान मिळाले आणि भूजलामधील आर्सेनिक काढून टाकण्यासाठी तंत्रज्ञान विकसित केलेल्या मेटलला आयआयटी-दिल्ली येथे इनक्युबेशनसाठी ५० लाख रूपयांचे अनुदान मिळाले. समसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पार्क आणि भारतातील युनायटेड नेशन्स रेसिडण्ट कोऑर्डिनेटर शॉम्बी शार्प यांच्या हस्ते या टीम्सचा प्रमाणपत्र व ट्रॉफी देत सन्मान करण्यात आला.

## मॅकडॉवेल्स अॅन्ड कंपनी तर्फे एक्स या प्रिमियम व्होडका

छत्रपती संभाजीनगर – कलाकृती ही सध्याच्या काळाची गरज आहे. म्हणूनच भारतातील सर्वाधिक आयकॉनिक आणि लिंजेंडरी ब्रॅन्ड असलेल्या तसेच १२५ वर्षांची परंपरा असलेल्या मॅकडॉवेल्स आणि कंपनी ने पुर्नशोध लावून आणि ग्राहकांना केंद्रस्थानी ठेऊन आपल्या पोर्टफोलिओत मोठा बदल केला आहे. संपूर्ण देशभरात पसरलेल्या सात डिस्टिलरीज, कच्चा माल मिळवणे आणि घटक हे देशासह जगभरातून मिळवले गेल्यानंतर आता मॅकडॉवेल्स न्ड कंपनीचे एक्स हे उत्पादन ग्राहकांसह सुंदर द्रवांचा समावेश आपल्या पोर्टफोलिओ मध्ये केला आहे, यामध्ये व्होडका पासून ते जिन पर्यंत नवीन सिट्रॉन रम पासून ते चविष्ट डार्क रम पर्यंत उत्पादने आहेत.

## नाविन्यपूर्ण टू-व्हिलर लोन समाधान लॉन्च केले

संभाजीनगर: श्रीराम समुहाची प्रमुख कंपनी असलेल्या श्रीराम फायनान्स लिमिटेडने आज टू-व्हीलर लोन एलिजिबिलिटी व्हाउचर योजनेचा शुभारंभ करत असल्याची घोषणा केली. येणाऱ्या सणासुदीच्या काळात आपल्या पसंतीची दुचाकी खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी टू-व्हीलर कर्जासाठी हा एक नाविन्यपूर्ण आणि अशा प्रकारचा पहिलाच वित्तपर्याय उपक्रम आहे.श्री वाय. एस. चक्रवर्ती, एमडी आणि सीईओ, श्रीराम फायनान्स कंपनीच्या या नवीन उपक्रमाविषयी बोलताना म्हणाले: टू-व्हीलर लोन एलिजिबिलिटी व्हाउचर सादर करताना आम्हाला अभिमान वाटतो आणि या सणासुदीच्या हंगामात आपली स्वतःची दुचाकी खरेदी करु इच्छिणाऱ्या सर्व ग्राहकांसाठी अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम आहे. श्रीराम फायनान्स ही महाराष्ट्रात दुचाकीसाठीच्या सर्वात मोठ्या वित्तपुरवठादार कंपन्यांपैकी एक आहे आणि या उपक्रमामुळे महाराष्ट्रात आमचे स्थान आणखी बळकट होण्यास तसेच ते उंचावण्यास मदत होईल.

## गुलकी जोशी एक गुंतगुंतीची केस सोडवणार

सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से या मालिकेत प्रसिद्ध पोलीस अधिकारी हसीना मलिकच्या रूपात गुलकी जोशीची एंट्री होत आहे. 'मॅडम सर' मालिकेत गुलकी जोशीने केलेली हसीना मलिकची व्यक्तिरेखा खूप गाजली होती. हसीना मलिकच्या चाहत्यांना तिचा बेडरपणा, तिची हुशारी आणि न्याय-निष्ठा फारच आवडली होती. आता गुलकी अभिनीत ही व्यक्तिरेखा या मालिकेत एक गुंतागुंतीची केस सोडवण्यासाठी आली आहे. त्यामुळे पडद्यावर पुन्हा तिचा मोहकपणा आणि करारीपणा जिवंत होईल.

# राज्य कॅबिनेटच्या बैठकीत विक्रमी ८० निर्णय

### नॉन क्रिमिलेयरची मर्यादा ८ वरून १५ लाख, पत्रकारांसाठी महामंडळ; मराठा आरक्षणाला मात्र बगल

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा बिगुल कोणत्याही क्षणी वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत विक्रमी ८० निर्णय घेतलेत. यात सरकारने नॉन क्रिमिलेयरची मर्यादा ८ लाखांवरून १५ लाख केली असून, लेवा पाटील समाज महामंडळ, संत गोरोबा कुंभार महामंडळ व कोळी समाज महामंडळाचा प्रस्तावही हातावेगळा केला आहे. विशेषतः पत्रकार व वृत्तपत्र विक्रेते यांच्यासाठीही सरकारने २ स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. कळीचा मुद्दा असलेल्या मराठा आरक्षणाला मात्र सरकारने बगल दिल्याचे स्पष्ट होत आहे.

महाराष्ट्रात पुढील आठवड्यात विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने विविध घटकांशी संबंधित ८० निर्णयांवर शिक्कामोर्तब केले. मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, आजच्या बैठकीत एकूण ८० निर्णय घेण्यात आले. त्यात काही नवी महामंडळे स्थापन करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. त्यात संत गोरोबा कुंभार महामंडळ, कोळी समाज महामंडळ, लेवा पाटील समाज महामंडळ, पत्रकार व वृतपत्र विक्रेते यांच्यासाठी २ स्वतंत्र महामंडळ आदींचा समावेश आहे.

सरकारने ओबीसी नॉन क्रिमिलेयरची मर्यादा ८ लाखांवरून १५ लाख करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव सरकारने पुढील कारवाईसाठी केंद्राकडे पाठवला आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाविषयीही मंत्रिमंडळाने अधिकार्यांना योग्य ते निर्देश दिलेत. पण मराठा आरक्षणाचा विषय आजच्या बैठकीत अजेंड्यावर घेण्यात आला नव्हता, असे गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

मंत्री गिरीश महाजन यांनीही यावेळी मंत्रिमंडळाने घेतलेल्या काही विशेष निर्णयांची माहिती दिली. ते म्हणाले, मराठवाड्यात गुजर समाज, लेवा पाटील समाज मोठ्या संख्येने आहे. त्यांच्यातील गरीब घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी सरकारने लेवा पाटील समाज महामंडळ स्थापन केले आहे. सरकारने हा निर्णय कुणाला खुश करण्यासाठी नव्हे तर वस्तुस्थिती पाहून घेतला आहे. सरकारने उद्योगपती रतन टाटा यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याचाही निर्णय घेतला आहे.

राज्य मंत्रिमंडळाचे निवडक निर्णय

१. वांद्रे शासकीय कर्मचार्यांना घरांसाठी जागा देणार (सार्वजनिक बांधकाम) २. सावनेर, कणकवली, राजापूर, अंबरनाथ, जिहे कठापूर, लातूरच्या जलसंपदा प्रकल्पांना मान्यता (जलसंपदा विभाग) ३. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमात सुधारणा (उच्च व तंत्र शिक्षण) ४. कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय (उच्च व तंत्र शिक्षण) ५. राज्यात तीन नव्या खासगी विद्यापीठांना मान्यता. (उच्च व तंत्र शिक्षण) ६. राज्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये पाळणाघरे सुरू करणार (महिला व बाल) ७. जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापतींच्या निवडणूकीस मुदतवाढ (ग्राम विकास) ८. सिडको महामंडळ व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिलेले भूखंड कब्जेहक्काने रुपांतरीत करणार (नगर विकास) ९. केंद्र शासनाची अॅग्रिस्टॅक योजना राबवणार (कृषि) १०. मा. बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्रास अतिरीक्त निधी (कृषि).११. पालघर जिल्ह्यातील विविध गावांतील जागा एमआयडीसीला (महसूल)१२. बोरीवली तालुक्यातील जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी (महसूल)१३. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याच्या अधिनियमात सुधारणा (महसूल) १४. कुर्ल्यातील शासकीय जमीन डायलेसिस सेंटरसाठी शाहीर अमर शेख प्रबोधनीला (महसूल) १५. बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालयात आफ्रिकन सफारी प्रकल्प (वने) १६. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना (पशुसंवर्धन, दुग्धविकास व्यवसाय) १७. भेंडाळे वस्ती प्रकल्प पाणी पुरवठा विभागास हस्तांतरित (मृद व जलसंधारण) १८. रमाबाई आंबेडकर मधील झोपडपट्टी पुनर्वसनासाठी खासगी जमिनीचा मोबदला देणार (गृहनिर्माण) १९. मराठवाड्यातील शाळांकरीता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत निधी (शालेय शिक्षण) २०. राज्यात आंतरराष्ट्रीय रोजगार व कौशल्य विकास कंपनी (शालेय शिक्षण) २१. शाळांना २० टक्के वाढीव अनुदानाचा टप्पा (शालेय शिक्षण) आदी निर्णय घेण्यात आले आहे.

## उद्योग 'रतन'वर शोकाकुल अवस्थेत अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१० ऑक्टोबर:**

भारतीय उद्योगजगताचे पितामह रतन टाटा यांच्या निधनामुळे देशभरात शोककळा पसरली असून उद्योग क्षेत्रासह राजकीय, सामाजिक आदी क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. रतन टाटा यांच्या पार्थिवावर सायंकाळी शासकीय इतमामात वरळीतील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले . पारशी धर्मियांच्या पध्दतीने 'टॉवर ऑफ सायलेन्स ' न करता विद्युत दाहिनीत शव ठेवण्यात आले. यावेळी विद्युत विविध क्षेत्रातील मान्यवराबरोबरच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करून गर्दी केली होती. एनसीपीए ते वरळीतील स्मशानभूमी पर्यंत पार्थिव वाहनात ठेवून मिरवणूक काढण्यात आली तत्पूर्वी नरीमन पाईट येथील एनसीपीए येथे सकाळी दहा वाजल्यापासून रत्न टाटा यांचे पार्थिव दर्शनासाठी ठेवण्यात आले होते.केद्रीय गृहमंत्री अमित शाह, यांच्यासह राजकारणासह राजकारण्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अंत्यदर्शन घेतले मुंबई पोलीस दलाच्या वतीने सलामी देण्यात आली. ८६ वर्षाचे जेष्ठ उद्योगपती रतन टाटा प्रकृती अस्वस्थ असल्याने सोमवारपासून ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत होते. राज्य सरकारकडून सर्व करमणुकीचे कार्यक्रम रद्द करून एक दिवसाच्या दुःखवटा जाहीर करण्यात आला.

ब्रीच कँडी हॉस्पिटल आतून आज सकाळी दहाच्या सुमारास पार्थिव एनसीपीए येथे आणण्यात आले. यावेळी टाटा समूहातील विविध अधिकारी व टाटा यांचे नातेवाईक यांना अश्रू अनावर झाले. फुलांनी सजविलेल्या पार्थिव दर्शनासाठी प्रांगणात ठेवण्यात आले.. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार ,माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ,रश्मी ठाकरे खासदार सुप्रिया सुळे, आदित्य ठाकरे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधान विधिमंडळातील नेते बाळासाहेब थोरात ,विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली.

## विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची १६ ऑक्टोबर रोजी बैठक

छत्रपती संभाजीनगर, दि.१०, (विमाका) :- विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची १६ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली असून विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर तथा अध्यक्ष, विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार असल्याचे विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य सचिव तथा उपायुक्त (महसूल) यांनी कळविले आहे.

विलंब, गैरव्यवहार, अकार्यक्षमता व इतर कारणाने होणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत जनतेच्या तक्रारी तसेच गाऱ्हाणी समितीकडून ऐकून घेण्यात येत असून लेखी स्वरूपातील तक्रारी स्विकारण्यात येतात. विशिष्ट अभिकथनाबाबत स्वतंत्र्यपणे स्थानिक चौकशी करण्याच्या दृष्टीने तजवीज करण्यात आली आहे.

भ्रष्टाचार कोणत्या क्षेत्रात तसेच ठिकाणी होत आहे याबाबत माहिती घेत त्या क्षेत्रातील किंवा त्या ठिकाणी भ्रष्टाचार निर्मुलनासाठी उपाययोजना केल्या जातात. तसेच प्रशासकीय कार्यपध्दती, नियम व इतर शासकीय व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचारास वाव राहू नये व त्यांचे निर्मुलन व्हावे यादृष्टीने सुलभता व पारदर्शकता आणण्याबाबत शिफारस करण्यात येते. सामान्य जनतेच्या प्रशासकीय कार्यपध्दतीबद्दल साशंकता वाटणार नाही व जनतेची कामे सहजगत्या कशी होतील याबाबत समिती मार्फत सबंधितांना सूचनाही बैठकीत देण्यात येतात.

## अजिंठा घाटात अज्ञात वाहणाची दुचाकी ला धडक; वृतपत्र विक्रेते तैय्यब देशमुख यांचा मृत्यू



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१० ऑक्टोबर : येथील वृतपत्र विक्रेते तैय्यब राजमल देशमुख (वय. ४७) यांचे दि.८ मंगळवार रोजी अजिंठा घाटात झालेल्या अपघातात निधन झाले.सिल्लोड येथून सोयगाव ला येते असतांना अजिंठा घाटात त्यांच्या दुचाकी ला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने तैय्यब देशमुख यांचा जागेवरच मृत्यू झाला.बुधवारी दि.९ सोयगाव ग्रामीण रुग्णालय येथे शवविच्छेदन करण्यात आले.११ वाजता गलवाडा रोडवरील दफनभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.गेल्या अनेक वर्षांपासून ते वृतपत्र विक्रेते म्हणून काम करत असल्यामुळे ते सुपरिचित होते.त्यांच्या अपघाती निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मुले,एक मुलगी असा परिवार आहे.

## हर घर नळ योजनेचे काम थातुरमातुर



तभा वृत्तसेवा

पैठण दि १० :- पैठण तालुक्यातील हिरडपुरी गांवात हर घर नळ योजनेचे काम काही ठिकाणी खोदकाम नाही करता थातुरमातुर पद्धतीने उरकले जात असून सदरील काम योग्य दर्जाचे केले जावे अशी मागणी गांवकऱ्यानी केली आहे.

पैठण तालुक्यात जल जीवन विकास प्राधिकरण अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा बोजवारा उडाला असून कोणत्या ठिकाणी कोणते काम आणि किती कोटींचे काम सुरू आहे. हे संबंधित अधिकाऱ्यांनाच माहीत नाही. अश्यात हिरडपुरी गावांत हर घर नळ योजनेचे काम थातुरमातुर पद्धतीने होत असतांना सदरील काम दर्जेदार व्हावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## माजलगावअत्याचार प्रकरणी पैठणला स्वर्णकार बांधवांचा मुक मोर्चा



तभा वृत्तसेवा

पैठण दि १० :- माजलगाव येथे पाच वर्षाच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ पैठण येथे नगराध्यक्ष सुरज लोळगे यांच्या मार्गदर्शनाखाली सराफा सुवर्णकार बांधवांच्या वतीने मुक मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चात बिडकीन, पाचोड, विहामांडवा, आडुळसह तालुक्यातल्या अनेक ठिकाणचे समाज बांधवांनी आप आपला व्यवहार बंद ठेवून सहभाग घेतला . पैठण शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व श्री महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मुक मोर्चाला प्रारंभ झाला. मोर्चा सहभाग झालेल्या सुवर्णकार समाजाच्या वतीने पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांना निवेदन देऊन. हा मुक मोर्चा शांततेत तहसील कार्यालयात पोचल्यावर नायब तहसीलदार राहुल बनसोडे यांना निवेदन देऊन सदरील प्रकरण जलद गती कोर्टात चालविण्यात येऊन आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या मोर्चात मोठ्या संख्येने सराफ स्वर्णकार समाज बांधव उपस्थित होते.

## ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे १०८ रुग्णवाहिका उपलब्ध राहत नसल्याने रुग्णांची होते गैरसोयी

### वैद्यकीय अधीक्षक यांना पत्रकारांनी दिले निवेदन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. ९ ऑक्टोबर पैठण तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे १०८ रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध राहत नसल्याने रुग्णांची होते गैरसोय याविषयी बिडकीन पत्रकार तसेच नागरिकांच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय दळवी यांना लेखी निवेदन देण्यात आले ,सविस्तर माहिती अशी की पैठण तालुक्यातील बिडकीन डीएम आय सी प्रकल्प मुळे बिडकीन शहर झपाटाने वाढत असून लोकसंख्येमध्ये वाढ होत आहे.ग्रामीण रुग्णालय बिडकीन मध्ये परिसरातील गाव, वस्ती, तांडे, तसेच छत्रपती संभाजीनगर ते पैठण रोड , व परिसर मधील कंपनीतील रुग्ण, लहान मोठे अपघातातील रुग्ण उपचारासाठी रुग्णालयात येतात, परंतु काही रुग्ण गंभीर स्वरूपाचे असल्याने त्यांच्यावरती प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर शासकीय रुग्णालयामध्ये पाठवण्यात येतात अशा वेळेस ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथील १०८ रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध राहत नसल्याने रुग्णांची मोठी गैरसोयी होते , आरोग्य विभागाकडून बिडकीन ग्रामीण रुग्णालयासाठी १०८ रुग्णवाहिका कायमस्वरूपी उपलब्ध करून दिली असून सुद्धा रुग्णवाहिका वर एक डॉक्टर ,वाहन चालक, यांची नेमणूक केली असताना सुद्धा वेळेवरती रुग्णवाहिका मिळत नसल्याने रुग्णांच्या नातेवाईकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे, रुग्णांची गैरसोयी होऊ नये व १०८ रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. विजय दळवी यांना लेखी निवेदन देण्यात आले यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणिता मात्रे,पत्रकार अरुण देविदास,हसन चाऊस, रवि गायकवाड,अली, इनामदार,कलीम इनामदार,अलिम शेख, व रुग्ण नातेवाईक यांची उपस्थिती होती.

# नादरपूरचा अनमोल रत्नः डॉ. अविनाश (अनाहत) जोशींचा यशाचा सोनेरी प्रवास

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि.१०. ऑक्टोंबर- डॉ. अविनाश (अनाहत) गुलाबजी जोशी एक साधं नाव, पण त्यात दडलेली एक अशी कथा आहे जिच्यात कष्ट, संघर्ष, आणि आत्मीयतेची सगळी परिमाणं आहेत. नादरपूरच्या मातीपासून उगवलेल्या त्यांच्या जीवनाच्या झाडाला आज यशाची आणि मान-सन्मानांची फळं लागली आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आजच्या तरुणांना स्वप्नं पाहायला शिकवणारा, त्यांच्यासाठी एक प्रकाशाचा स्तंभ ठरलेला माणूस म्हणजेच डॉ. जोशी.

प्रारंभिक जीवन: संघर्षात सापडलेली प्रेरणा

डॉ. जोशी यांचं बालपण म्हणजे जीवनाचा संघर्ष कसा असावा याचं जिवंत उदाहरण होतं. नादरपूरमधल्या एका छोट्याशा गावात, जिथं साधं जगणंही कधी कधी अवघड व्हायचं, तिथं त्यांचा जन्म झाला.



त्यांच्या आई-वडिलांनी खूप कष्ट करून लहानसं हॉटेल चालवलं, फक्त मुलांना शिकवायचं म्हणून. त्यांनी कधीच त्या अडचणींचं ओझं मुलांवर येऊ दिलं नाही, पण डॉ. जोशी यांना त्या प्रत्येक संघर्षाचा प्रत्यय होत राहिला. त्यांनी ते पाहिलं, जाणलं, आणि त्यात स्वतःला गवसवलं. कष्टाने मिळवलेल्या यशाचं मोल काय असतं, हे त्यांना अगदी लहानपणीच कळलं. शिक्षणाच्या प्रवासात, त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून वाणिज्य शाखेत पदवी मिळवली. त्याचबरोबर अॅक्युप्रेशर, निसर्गोपचार, आणि मानसशास्त्र या विषयात विशेष शिक्षण घेतलं.

उद्योजकीय ध्येय: परंपरेच्या मुळांशी घट्ट बांधलेले

डॉ. जोशी यांचं जगणं केवळ स्वतःसाठी नव्हतं, तर समाजासाठी होतं. त्यांनी भारतीय परंपरांवर गाढ प्रेम केलं आणि त्या परंपरांना त्यांनी आपल्या कामातून नवजीवन दिलं. 'समर्पण बिझनेस ग्रुप' ची स्थापना करून, त्यांनी आधुनिकतेला आणि पारंपरिक ज्ञानाला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रत्येक उत्पादनात - मग ते साबण असो, अगरबत्ती असो, किंवा पूजा साहित्य - आपल्याला भारतीय संस्कृतीचा घनिष्ट स्पर्श जाणवतो. त्यांच्या



व्यवसायाने आज ६०० पेक्षा जास्त लोकांना रोजगार दिला आहे, ज्यांच्यासाठी डॉ. जोशी म्हणजे केवळ मालक नसून एक कुटुंबप्रमुख आहेत.

राजस्थानच्या मातीचा सुगंध त्यांच्या व्यवसायाला लागलेला आहे. तिथं त्यांनी आपल्या कष्टांनी एक मोठं साम्राज्य उभं केलं. त्यांच्या व्यवसायाची सुरुवात म्हणजेच एक स्वप्न पूर्ण होण्याची कथा, जिथं कधीही हार न मानणाऱ्या मनाचा विजय झाला.

विविध क्षेत्रांतील कार्य आणि नवसंशोधन

डॉ. जोशी यांनी केवळ एक व्यवसाय निर्माण केला नाही, तर त्यांनी एक संपूर्ण जीवनपद्धती दिली आहे. 'समर्पण बिझनेस ग्रुप' हे एका मोठ्या गटाचं नाव आहे, जिथं 'अदिती ज्योतिष सेवा', 'भारत आयुर्वेद फार्मा', 'समर्पण पब्लिकेशन', 'समर्पण टॅलेंट सर्च परीक्षा', 'समर्पण हीलिंग सेंटर', आणि इतर अनेक शाखा आहेत. प्रत्येक शाखेत डॉ. जोशींच्या परंपराविषयी असलेल्या प्रेमाची आणि व्यवस्थापन कौशल्याची झलक दिसते.

पुरस्कार आणि मान्यता: कष्टांचा सन्मान

डॉ. जोशी यांची कामगिरी त्यांच्या पुरस्कारांच्या यादीतून स्पष्ट होते. 'इंडियन आयडॉल ऑफ इंप्रेशन २०१९', 'महाराष्ट्र युथ आयकॉन २०२०', 'नॅशनल प्राईड अवॉर्ड २०२३', आणि 'छत्रपती उद्योग सेवा गौरव पुरस्कार' या सारख्या अनेक सन्मानांनी त्यांचं कौतुक केलं आहे. हे पुरस्कार त्यांच्या जीवनातील एका साध्या व्यक्तीचा संघर्ष आणि त्यातून साकारलेलं स्वप्न याचं प्रमाण आहेत.

आरोग्य आणि अध्यात्मातील योगदान: हृदयाशी संवाद

डॉ. जोशी हे केवळ उद्योजकच नाहीत, तर ते एक आयुष्य घडवणारे व्यक्तिमत्व आहेत. निसर्गोपचार, मंत्र चिकित्सा, ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र - या सगळ्या विषयांत त्यांनी आपलं स्थान निर्माण केलं आहे. त्यांचं अध्यात्म, त्यांचं ज्ञान, आणि त्यांनी दिलेला आनंद हा हजारो लोकांच्या आयुष्यात प्रेम, शांती, आणि समाधानाची जाणीव घेऊन येतो.

लेखनाची सखोलता: हृदयाला भिडणारे विचार

डॉ. जोशी यांची लेखणी म्हणजे एक अशी शक्ती आहे, जी हजारो लोकांच्या मनात आशा निर्माण करते. मराठी, हिंदी, आणि इंग्रजी या भाषांमध्ये त्यांनी आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या लेखांतून केवळ वैदिक ज्ञान नाही तर जीवन कसं जगावं, त्याचं मर्म काय आहे हे कळतं.

समाजावरचा प्रभाव: समर्पणाचं शाश्वत मूल्य

डॉ. जोशी यांचा प्रवास केवळ त्यांच्या स्वतःच्या यशाची गोष्ट नाही. ते समाजासाठी एक दीपस्तंभ आहेत, ज्यांनी हजारोंच्या जीवनाला नवा आकार दिला आहे. कष्ट, त्याग, आणि समर्पणाच्या बळावर त्यांनी आपल्या स्वप्नांना आकार दिला, आणि त्या स्वप्नांची फळं आज समाजातल्या अनेक लोकांपर्यंत पोहोचली आहेत. आज त्यांचं नाव केवळ एक यशस्वी उद्योजक म्हणून नाही, तर हजारोंच्या जीवनात प्रेम, कर्तृत्व, आणि प्रामाणिकपणाचं प्रतीक म्हणून घेतलं जातं. त्यांचा स्पर्श असंख्य लोकांच्या हृदयाला नवी दिशा देतो आहे, आणि ही कहाणी इथं थांबत नाही. डॉ. जोशी यांचा प्रवास अजून सुरू आहे, त्यांच्या हातून समाजात अजूनही अनेक सकारात्मक बदल घडत आहेत, आणि त्यांच्या समर्पणाचं हे दीपक अखंड प्रज्वलित राहणार आहे.

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# काँग्रेसचा रडीचा डाव...

लोकसभा निवडणुकीत ९९ जागा जिंकल्यानंतर काँग्रेस पक्ष हवेत उडत होता. हरयाणा विधानसभा निवडणुकीतील पराभवामुळे तो तोंडाच्या भारावर आपटून, त्याची बोलती बंद झाली आहे. हुड्ड्यांच्या नेतृत्वात सत्तेत येण्याचे स्वप्न पाहणारा काँग्रेस पक्ष अजूनही आपला पराभव झाल्याचे मान्य करण्यास तयार नाही. त्याने आपले जुनेच रडगाणे सुरू ठेवलेले आहे. ईव्हीएममुळे आमचा पराभव झाला, हे पालुपद त्याने पुन्हा लावलेले आहे. काही काँग्रेस नेते म्हणत आहेत की, निवडणूक आयोगाने विजयाचे आकडे घोषित करण्यास विलंब लावल्याने प्रक्रियेत काही काळेबेरे असल्याची शंका येत आहे. एक मात्र खरे की, या निकालामुळे काँग्रेसचे विनाकारण आकाशात उडवण्यात आलेले विमान जमिनीवर आले असून पक्षाच्या नेत्यांची तोंडे काळवंडली आहेत. एक महिना अगोदरपर्यंत राज्यात काँग्रेस पक्ष सत्तेत येणार, अशी भाकिते सर्वच पोलपंडितांनी वर्तविली होती. तशी परिस्थिती होती. लोकसभेतील पडझडीतून भाजपा सावरलेला नव्हता. शेतकऱ्यांची नाराजी सुरू होती. जाट मतदार जवळ येण्यास तयार नव्हता. अनुसूचित जातीचे मतदारही नाराज होते (किंवा तसा नॅरेटिव्ह सेट केला गेला होता). एमएसपीवरून राजकारण सुरू असल्याने सर्वत्र संभ्रमाचे वातावरण होते. देशभरात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांनी समाजमन घुसळून निघाले होते. बेरोजगारीचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात चर्चेला आणला गेला होता. अग्निवीर योजनेबद्दल उलटसुलट सांगून मतदारांना गोंधळात टाकले जात होते. मनोहरलाल खट्टर यांच्याऐवजी मुख्यमंत्रिपदी नियुक्त करण्यात आलेले नायबसिंह सैनी यांना त्यांचा करिष्मा दाखविण्याची फारशी संधीही मिळाली नव्हती. केंद्रात अपेक्षित यश न मिळाल्याने भाजपात मरगळ होती. पक्षाचे नेतेही विजयाबाबत साशंक होते. एक्झिट पोलमध्ये त्याचे प्रत्यंतर दिसून आले. पण प्रत्यक्षात मतमोजणीनंतर जो निकाल आला, विजयाची जी शृंखला भाजपाने तिसऱ्यांदा कायम राखली त्यातून पक्ष कार्यकर्त्यांमधील मावळलेला उत्साह पुन्हा परतला आहे. जम्मू-काश्मीरमध्येही विधानसभा निवडणुकीत लोकशाही आणि संविधानाचा विजय झाला. तेथे नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसची सत्ता येणार, हे निश्चित झाले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रथमच या राज्यात विक्रमी संख्येने आणि शांततेच्या वातावरणात निवडणुका पार पडल्या. युनोच्या निरीक्षकांनाही फेअर निवडणुकांची प्रचीती आली. त्यांनी श्रीनगरमधील मतदान केंद्रांवर सुरळीत आणि शांततेत पार पडलेल्या मतदानाची दखल घेतली. दोन्ही राज्यांतील निवडणुकांचे निकाल हाती आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जनतेशी संवाद साधला. त्यांच्या वक्तव्यात दम होता. कारण हरयाणाने देशाचा मूड काय आहे? हे जगाला सांगून दिले होते. कोणत्याही सरकारचे तिसऱ्यांदा निवडून येणे अर्थात विजयाची हॅट्‌ट्रिक साधणे ही बाब ऐतिहासिकच म्हणायला हवी. पण काँग्रेसला ही बाब अमान्य आहे. निवडणुकीच्या सत्ताधारी भाजपाचा पराभव करण्यासाठी काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या संपूर्ण इकोसिस्टिमने अहमहमिकेने काम केले. या इकोसिस्टिमसह शहरी नक्षलवाद्यांच्या फौजेने लोकांना संभ्रमात टाकण्याची भूमिका अदा केली. दलितांमध्ये संभ्रम पसरवण्याचा प्रयत्न केला. मध्यमवर्गीयांना या शासनाने काहीच दिले नाही, असा गैरसमज पसरविला. पण दलितांनी आणि मध्यमवर्गीय समाजानेच त्यांच्या फूटपाडू विचारांना दूर लोटले. अमेरिकेत आरक्षणाबाबत उलटसुलट विधाने केल्याने दलितांमध्ये राहुल गांधींबद्दल नाराजी पसरून, या समाजाने ओबीसींसोबतच भाजपाला दणदणीत मतांनी जिंकून आणले.

'व्हिक्ट्री हॅज मेनी फादर्स अॅण्ड डीफीट इज लाईक ऑर्फन' अशी इंग्रजीत एक म्हण आहे. त्यानुसार काँग्रेस पक्षातील पडझडीची जबाबदारी स्वीकारण्यास कोणीही तयार नाही. कोणी ईव्हीएमवर तर कोणी शेतकऱ्यांवर पराभवाचे खापर फोडत आहे. काहींनी कुमारी शैलजा यांनी वेळेवर स्वतःला प्रचारापासून दूर ठेवल्याने काँग्रेसचा पराभव झाल्याचा कांगावा सुरू केलेला आहे तर काही जण निरनिराळ्या एजन्सींच्या मदतीने भाजपाने निवडणूक जिंकल्याचा कयास लावण्यात गुंतले आहेत; पण आपसातील सुंदोपसुंदीने काँग्रेसचा बळी घेतला आहे. भूपेंद्र हुड्डा यांनी तिकीट वाटपात केलेल्या घोळाची प्रसिद्धी माध्यमांनी दखल घेतली आहे. तिकीट वाटपामुळे नाराज झालेल्या अनेक काँग्रेस नेत्यांनी बंडखोरी करून पक्षाच्या उमेदवारांनाच आव्हान दिले. यातून सुमारे १० जागांवर पक्षाचे उमेदवार कमी मतांच्या फरकाने हरले. याची दखल पराभवाबाबत चिंतन करताना घेतली जायला हवी. निवडणुकीच्या तोंडावर २५ नेत्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्यामुळेदेखील काँग्रेसचे नुकसान झाले. स्वतःतील दोष बघायचे नाहीत आणि इतरांना वाकुल्या दाखवत फिरत राहायचे, ही काँग्रेसची जुनी खोड आहे. त्याबाबतही मोदींनी टिप्पणी केली आहे. काँग्रेस ही द्वेष पसरवणारी मोठी फॅक्टरी बनणार आहे, असे स्वातंत्र्यानंतरच अनेक नेत्यांना कळले होते. त्यामुळे काँग्रेस विसर्जित केली जायला हवी, असे विधान दस्तुरखुद्द महात्मा गांधी यांनी केले होते. याकडे मोदींनी लक्ष वेधले. काँग्रेस स्वतःहून संपली नाही. पण या पक्षाचे नेते देशाला संपवण्याचा प्रयत्न करत आहेत, याकडेही मोदींनी लक्ष वेधले.

काँग्रेसचा पराभव झालेला दिसताच महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी काँग्रेसवर टीका करायला सुरुवात करून दिली आहे. कुणीही आपल्याला मोठा भाऊ समजू नये या शब्दात शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी काँग्रेसवर टीकास्त्र सोडले आहे. काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढायच्या असतील तर त्यांनी तशी भूमिका घ्यावी, म्हणजे इतर पक्षांनाही आपापल्या भूमिका ठरवणे सोपे होईल, याकडेही राऊत यांनी लक्ष वेधले आहे. दुसरीकडे आम आदमी पार्टीचे नेते माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी कोणतीही निवडणूक सहज घेऊ नये, अशी सूचकच काँग्रेसला सहानुभूतीचा सल्ला दिला आहे. हरयाणात शेवटच्या घटकेपर्यंत काँग्रेस आणि आम आदमी पार्टीमध्ये युती होणार, अशी चर्चा होती. आम आदमी पक्षाने केवळ ५ जागा मागितल्या होत्या; पण काँग्रेसने त्या नाकारल्या. हरयाणात जागा दिल्या तर पुढे दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसलाही जागा द्याव्या लागतील, अशी आम आदमी पार्टीला धास्ती होती. त्यामुळे त्यांनीही हे प्रकरण वाढवले नाही. अखेरच्या दिवसात उभय पक्षांनी एकमेकांपुढे झुकणे नाकबूल केल्याने येथे स्वबळावर लढण्याची घोषणा केली गेली. निवडणुकीचे व्यवस्थापन हे स्वतंत्र तंत्र आहे. गेल्या अनेक निवडणुकांमध्ये काँग्रेसला सातत्याने पराभवाचे तोंड बघावे लागत आहे, ही वस्तुस्थिती नाकारण्यात लाज कसली? प्रचंड टीका-टिप्पणी करून, जातीय विद्वेष पसरवून, लोकांमध्ये संभ्रम निर्माण करूनही काँग्रेसला म्हणावे तसे यश मिळेनासे झाले आहे. इंग्रजांनी 'फोडा आणि झोडा' हे धोरण वापरले आणि देशावर वर्षानुवर्षे राज्य केले. आता तशीच वेळ काँग्रेसने हिंदू समाजावरही आणली आहे. हिंदूंमध्ये फूट पाडण्याचा त्यांचा प्रयत्न फारसा यशस्वी झाला नसला, तरी मुस्लिमांचे एकगठ्ठा मतदान मिळवण्यात इंडिया आघाडीला यश आले आहे. या दोन निवडणुकीचे परिणाम महाराष्ट्राच्या निवडणुकांवरही झालेले बघायला मिळतील. हरयाणाच्या निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सहभाग महत्त्वपूर्ण राहिल्याचे निष्कर्ष काढले जात आहे. संघाच्या कार्यकर्त्यांनी शत-प्रतिशत मतदानासाठी प्रत्येक मतदारसंघात छोट्या बैठका, एकत्रिकरण आणि मोठ्या सभांचे आयोजन अशी संकल्पना निश्चित केल्याचे माध्यमे सांगत आहेत. हरयाणात संघाच्या पुढाकारातून तब्बल १६०० सभा-संमेलने झाल्याचे सांगितले जात आहे, ही बाबही ध्यानात घ्यायला हवी. आधीच महाविकास आघाडीत तीन पक्षांच्या तीन चुली आहेत. त्यात आणखी काही घटक पक्षांची भर पडेल, असा कयास बांधला जातो आहे. युती एकजूट असून तिचा सामना करण्यासाठी मविआनेसुद्धा वज्रमूठ आवळण्याची गरज आहे. हरयाणातील भाजपाचा विजय सुशासनाचा आणि विकास कामांचा आहे. 'राष्ट्र प्रथम' या भावनेतून केलेल्या कामांना जनतेची पसंती मिळालेली आहे. सरकारने चालविलेल्या जनकल्याणकारी योजनांना लोकांची पसंतीची मोहर बसली आहे. या निवडणुकीतील विजयाने वाढलेला विश्वास भाजपाला महाराष्ट्र, झारखंड आणि दिल्लीत भविष्यात होऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये होणार आहे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# उद्योग संवर्धिनी पुण्यश्लोक अहल्यादेवी

प्रजेचे संरक्षण आणि आपल्या राज्याच्या सीमांचे रक्षण करणे हे शासनकर्त्याचे आद्य कर्तव्य असते. संरक्षकाची भूमिका पार पाडताना राज्यकर्त्याला अनेक कार्ये करावी लागतात. सतत उत्तरेला लढाया, मुलुखगिरीवर असणाऱ्या सुभेदार होळकरांची सैन्य भरती, दारूगोळा, शस्त्रास्त्र, पैसा आणि इतर रसद यासाठी आपल्या जहागिरीवरच मदार होती. या सगळ्या गोष्टींच्या पुरवठ्याची तजवीज करण्यासाठी ते सुरुवातीला पत्नी गौतमादेवींवर आणि नंतर पुण्यश्लोक पुण्यश्लोक अहल्यादेवींवर अवलंबून असत. मल्हारराव संपूर्ण तोफखान्याची व्यवस्था लावण्याची जबाबदारी ते पुण्यश्लोक अहल्यादेवींवर सोपवत होते. तोफखाना अद्ययावत ठेवण्यासाठी मनुष्यबळ लागते. तोफा ओतणे, दारूगोळा तयार करून पुरवठा करण्याच्या स्थितीत राखणे, तोफांच्या वाहतुकीसाठी बैलांची व्यवस्था, त्या बैलांना चारापाणी, जंबुऱ्याच्या (बंदूक) साठी योग्य त्या गोळ्यांचा पुरवठा या प्रत्येक कामासाठी लागणारा वेळ आणि मनुष्यबळ या सगळ्या गोष्टींचे महत्त्व समजून नियोजन आणि अंमलबजावणी, ही सर्व कामे पुण्यश्लोक अहल्यादेवी करवून घेत होत्या, हे वरील पत्रांमधून स्पष्ट होते. हे सगळे आपल्या जहागिरीतच किंवा मित्र सरदारांच्या जहागिरीत करवून घेतले जात असे. स्वसंरक्षणासाठी सर्व शस्त्र सामग्रीच्या पुरवठ्यासाठी इतर देशांवर अवलंबून राहणे म्हणजे स्वतःचे स्वातंत्र्य धोक्यात आणणे होय, हे समजण्यासाठी स्वतंत्र भारताला नरेंद्र मोदी पंतप्रधान म्हणून लाभावे लागले, हे इथे लक्षात घेतले पाहिजे. संरक्षण हा अखंडपणे करण्याचा उद्योग असतो, हे समजले की, पुण्यश्लोक अहल्यादेवींमधील उद्योजिकेचे कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही. तसेच त्या काळी अनेकदा त्या स्वतः जातीने युद्ध साहित्याचा पुरवठा करण्यासाठी सांडणीस्वार घेऊन गेल्याचेही दाखले मिळतात. जयपूरजवळ शिद्यांनी तुकोजीराव होळकरांवर स्वारी केली. तुकोजी होळकरांनी सगळी हकीकत पुण्यश्लोक अहल्यादेवींना लिहून कळविली. त्यांनी लागलीच ५ लक्ष रुपये आणि १८०० सैनिकांची कुमक तुकोजीरावांना पाठवली. यावरून त्या काळात असलेल्या राजकीय स्त्रियांना मानाचे स्थान मिळत होते, हे स्पष्ट होते तसेच पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकरांचा आत्मविश्वास आणि कर्तृत्वदेखील दिसून येते.



पुण्यश्लोक अहल्यादेवींनी आपली राजधानी महेश्वर येथे हलवली. नर्मदा नदीच्या काठावर सुंदर घाट बांधले. स्वतः राहण्यासाठी मात्र एक साधासा वाडा आणि महादेवाचे मंदिर बांधले. महेश्वर हे उद्योग नगरी म्हणून नावारूपाला आणण्यासाठी भारताच्या विविध भागांतून कुशल कारागीर बोलावले. त्यांना आवश्यक ती साधनसामग्री, सोयी-सुविधा दिल्या. काही प्रमाणात प्रशिक्षित केले. योग्य त्या व्याजदराने कर्जपुरवठा केला. व्यावसायिकांना कर्जपुरवठा होळकरांच्या खाजगीकडून करण्यात येत असे. पुण्यश्लोक अहल्यादेवी गादीवर असल्याने त्या कर्जाची वसुली न्याय मार्गाने होत असे. स्वतः कुशल विणकरांना महेश्वरला आमंत्रित केल्याने या व्यवसायाला आपोआप राजाश्रय प्राप्त झाला. महेश्वरी साडीचा घाट, पोत आणि डिझाईन तयार होऊन देश पातळीवर एक ब्रॅण्ड तयार झाला. उद्योगांना संरक्षण मिळाल्याने विविध उद्योग होळकरांच्या राज्यात आले. मल्हारराव होळकरांच्या कारकीर्दीत ७५ लाख रुपये असलेले राज्याचे उत्पन्न पुण्यश्लोक अहल्यादेवींच्या कारकीर्दीत १ कोटी ५ लाख रुपयांच्या वर गेले. विणकरांमधील गुणवत्ता हेरून त्यांना महेश्वर येथे साधनसामग्री, भांडवल, सुरक्षा आणि बाजारपेठ प्रदान केली. आजही महेश्वर हे साड्यांसाठी प्रसिद्ध उत्पादन केंद्र आहे. विविध उद्योगांना होळकर राज्यात आश्रय मिळाला. विद्वान, कवी, साहित्यिक यांनादेखील पुण्यश्लोक अहल्यादेवींनी राजाश्रय दिला. अनेक पोथ्या, पुराणे यांची हस्तलिखिते स्वतःच्या राज्यात अनेकांना वसवून करवून घेतली. या सगळ्या गोष्टींना असलेला आर्थिक आयाम लक्षात घेतला की, उद्योजिका म्हणून पुण्यश्लोक अहल्यादेवींनी केलेल्या कामाची महती पटते.

पुण्यश्लोक अहल्यादेवींच्या काळात उद्योग व्यवसायाशी संबंधित दळणवळण कच्च्या रस्त्याने होत असे. नर्मदा नदीच्या उत्तर आणि दक्षिण अशा दोन्ही तीरावरील निमाडमधील डोंगराळ मुलूख (शूलपाणीचे जंगल) पूर्ण असुरक्षित होता. चोऱ्यामाऱ्या, डाके, लूटमार, प्रवाशांची लुबाडणूक हे नित्याचेच झाले होते. निमाडचा हा भाग पुण्यश्लोक अहल्यादेवींच्या राज्याला जोडण्यात आल्यानंतर त्यांनी हा भाग सुरक्षित करण्यासाठी तेथील उपद्रवी भिल्ल जमातीला सर्वप्रथम उपजीविकेचे साधन मिळवून देण्यासाठी जवळपासची शेतीयोग्य जमीन या भिल्लांना कसण्यासाठी दिली. या प्रदेशात भिलकवाडी नावाचा एक कर आकारला जात असे. विभिन्न ठिकाणी या कराचा दर मात्र वेगवेगळा लावला जात होता तसेच हा गोळा केलेला कर सरकार जमा होण्याची कोणतीही शाश्वती नव्हती. त्यात सुसूत्रता आणून त्यांनी कर वसुलीसाठी त्या प्रदेशातील भिल्लांचीच नेमणूक केली. यातील काही भाग त्यांनी ठेवून उरलेला भाग सरकार जमा करावा, असा नियम केला. त्या बदल्यात वाटसरू, व्यापारी यांच्या जानमालाची सुरक्षा भिल्लांवरच सोपवली. अशा प्रकारे एका समाजविघातक जनसमुदायाला समाजोपयोगी समुदायात परावर्तित केले. कुठे भिल्लांनी उपद्रव केला तर त्यांचा बंदोबस्तदेखील केला. त्यांच्या मनात शासनाप्रती विश्वास निर्माण केला आणि तरीही काही नाठाळ उरले तर त्यांचे पारिपत्य करून तो प्रदेश सुरक्षित केला. या उपाययोजनेमुळे प्रदेश सुरक्षित झाला, लोकांना उपजीविकेचे साधन मिळाले, भिल्लांच्या लूटमारीच्या सवयी बदलल्या, व्यापारी प्रवासी उद्योजक व त्यांचा माल सुरक्षित झाला आणि राज्याच्या तिजोरीत कर संकलनाद्वारे भर पडली. या देशाच्या कोणत्याही प्रदेशात गेल्यास पुण्यश्लोक अहल्यादेवींनी उभारलेली लोकोपयोगी कामे नजरेस पडतात. अनेक तीर्थक्षेत्री नदीला उत्तम घाट, धर्मशाळा, अन्नक्षेत्र, निवारे, रस्ते, असे प्रचंड मोठे बांधकाम पुण्यश्लोक अहल्यादेवींनी करून घेतले. बांधकामाद्वारे त्या त्या प्रदेशात त्यांनी अनेकांना रोजगार मिळवून दिला. त्याच वेळी भारतीय स्थापत्य कलेची जोपासना केली. पुण्यश्लोक अहल्यादेवींच्या या कामांचा आवाका एवढा मोठा होता की, पाथरवटांच्या छिन्नीच्या टिकटिकीमुळे मराठीत 'चालू दे होळकरी टाकी' अशी एक म्हणच रूढ झाली. हिंदू धर्मातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी आठ ठिकाणी त्यांनी जीर्णोद्धार, मंदिर उभारणी, धर्मशाळा, नदीला घाट, विहिरी अशी असंख्य कामे केली. त्याच वेळी अयोध्या, मथुरा, वृंदावन, हरिद्वार, बद्रीनारायण, द्वारका, जगन्नाथ पुरी येथेही लोकोपयोगी बांधकामे करवली. या बांधकामांद्वारे त्यांनी विविध क्षेत्रांत रोजगार निर्मिती केलीच; पण सनातन हिंदू धर्माच्या विस्तारालादेखील हातभार लावला. आपल्या राज्यात न्याय, सुव्यवस्था, उद्योग सहायक सुविधा निर्माण करणाऱ्या पुण्यश्लोक अहल्यादेवींच्या कारकीर्दीत राज्याचे उत्पन्न दुपटीने वाढले. याला कारण त्यांनी त्यांच्या राज्यात उद्योग, शेती, पाणी पुरवठा, रस्ते आणि सुरक्षेला दिलेले प्राधान्य होय. या दृष्टीने पुण्यश्लोक अहल्यादेवींना उद्योग संवर्धिनीच म्हणायला हवे.

९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# खेळायचे होते, खेळतो आहे...!

हल्ली मुलांच्या करीअरवरून पालकच जास्त तणावात असल्याचे चित्र समाजात दिसू लागले आहे. मुलाने दहावीची परीक्षा दिली की, पालक आपल्या मुलांसाठी करीअरच्या वाटा शोधू लागतात. मुलाला काय करायचे आहे, त्याचा कल कुठल्या दिशेने आहे, त्याची आवड कशात आहे, हे समजून घेणारे फार थोडे पालक आहेत. पालकांनी मुलांना करीअर निवडण्यासाठी जरूर मार्गदर्शन करावे, त्यांना मदतही करावी. मात्र, तुला हेच करायचे आहे, याच फिल्डला जायचे आहे, इथे तुला जास्त पॅकेज मिळेल, त्या ठिकाणी तुला चांगली प्लेसमेंट मिळेल, असे म्हणत मुलांवर आपला निर्णय थोपविणारे पालक सर्वत्र दिसू लागतात. दहावीनंतर कोचिंग क्लासेसचे तर पेव फुटले आहे. सर्वात जास्त प्रवेश जर कुठल्या फिल्डकडे असेल तर तो म्हणजे अभियांत्रिकी आणि वैद्यकीय. साऱ्याच पालकांना आपला मुलगा एक तर डॉक्टर नाहीतर इंजिनीअर व्हावा असेच वाटते. याही उपर जाऊन काही पालक तर आपल्या मुलाला केवळ शासकीय नोकरी मिळावी यासाठी प्रचंड धडपड करीत असतात. शासकीय नोकरी मग ती शिपायाची का असेना; मात्र त्यांना या ठिकाणी मुलाला चिटकवायचे असते. काही पालक आता मुलांच्या आवडीनुसार त्यांना त्यांचे करीअर करण्यासाठी स्वातंत्र्य देऊ लागले आहेत. मुलांना समजून घेऊ लागले आहेत. मुलगा जे करीअर निवडतो त्या करीअरमध्ये त्याला यश मिळविता यावे यासाठी मदतदेखील करू लागले आहेत. निश्चितच ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र, अद्याप काही पालक जुन्याच मानसिकतेत आहेत. क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरनंतर क्रिकेटमध्ये करीअर करणाऱ्या अनेक मुलांना त्यांच्या पालकांनी मदत केली आहे. आजही खेळामध्ये करीअर करणाऱ्या मुलांच्या दृष्टीने पालकांची अनास्था मोठी असल्याचे जाणवते. मुलांना खेळातही संधी दिल्यास त्यांना त्यांचे करीअर घडविता येऊ शकते, हे आकाश दीप या क्रिकेटरमुळे दिसून आले आहे. भारत-बांगलादेश कसोटी मालिका जिंकल्यावर ज्याने सर्वाधिक आनंदाने चषक उंचाविला तो आकाश दीप! मुलगा क्रिकेट खेळतो म्हणून वाया गेल्यात जमा आहे, असे त्याच्या आई-वडिलांना तर वाटत होतेच; पण त्याच्या शेजाऱ्यांनाही तेच वाटत होते. आई-वडील जर मुलांच्या करीअरच्या बाजूने नसतील तर शेजारीसुद्धा त्या मुलांना टोचून बोलण्यात आघाडीवर असतात. आकाश दीपच्या बाबतीतही असेच काहीसे होते. आकाशच्या क्रिकेट खेळण्याला त्याच्या वडिलाचा पराकोटीचा विरोध होता. आपल्या मुलाने स्पर्धा परीक्षा द्याव्या, ते नाहीतर किमान त्याने बिहार पोलिसात भरती व्हावे आणि हेही नाही जमले तर कमीत कमी कुठल्या तरी सरकारी नोकरीत त्याने शिपाई म्हणून चिकटावे, असे आकाशच्या वडिलांना वाटत होते. बिहारमधल्या सासाराममध्ये शिक्षक असलेल्या रामजी सिंग यांना दोन मुलं, दोन मुली. संसाराचा गाडा चालविताना आपल्या मुलाचे भवितव्य सुरक्षित असावे, अशी त्यांची इच्छा होती. पण २००७ नंतर आकाशला क्रिकेटचा नाद लागला. नेमके त्याच काळात बिहार क्रिकेट असोसिएशनवर बंदी होती. शिवाय क्रिकेट खेळून आपला मुलगा काही मोठा तेंडुलकर होणार नाही, अशी पक्की खात्रीच त्यांना होती. पण याच मुलाला राहुल द्रविडच्या हस्ते इंडिया कॅप मिळाली. मात्र, दुर्भाग्य असे की, हा सुवर्ण क्षण बघायला त्याचे वडील आणि भाऊ दोघेही नव्हते. वडील अर्धांगवायू झाल्याने आजारी होते; त्यात ते गेले. सहा महिन्याने मोठा भाऊसुद्धा दगावला. दोन बहिणी आणि आई मात्र लेकराचं कौतुक बघायला हजर झाल्या होत्या. बिहारमधील बड्डी हे आकाशचे गाव. रांचीपासून ३०० किमी दूर. रांचीत त्याने भारतीय संघाकडून पदार्पण केले. आज क्रिकेटमध्ये आपली ओळख निर्माण करणारा आकाश दीप सांगतो की, आपण क्रिकेट खेळू असं वाटायचं, पण वडिलांना चोरून खेळावे लागे आणि त्यांना समजावणे हे कठीण होते. म्हणून दिल्लीला गेलो. त्यावेळी तिथे खाण्यापिण्यासह राहण्याचेसुद्धा हाल होते. मग बंगालमध्ये दुर्गापूरला जाऊन आकाश टेनिस बॉल स्पर्धा खेळू लागला. दिवसाकाठी ६०० रुपये मिळवून आकाशचे क्रिकेट वेड सुरू राहिले. पण खरे क्रिकेट सुरू झाले ते २०१६ मध्ये. प्रशिक्षक रणदेव बोस, सौरासिश लाहिरी यांनी त्याला घडविले. २०२१ मध्ये तो आरसीबी संघात दाखल झाला आणि क्रिकेटचे मैदान गाजविणे सुरू केले. आज आकाशला त्याच्या यशाबद्दल विचारल्यावर तो म्हणतो, ''मला जगण्याने जे शिकविले ते शिकतो आहे आणि खेळायचे होते, फक्त खेळतो आहे!'' मुलांना खेळायचे असेल तर खेळू द्या, त्यांच्या इच्छा आणि त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातच त्यांना करीअर करण्याची संधी द्या; जेणेकरून तो आयुष्यभर आनंदी असेल.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# पराभूत काँग्रेसला अतिआत्मविश्वास नडला

हरयाणा विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसचा पराभव त्यांच्यासाठी अनपेक्षित आणि धक्कादायक असला, तरी तो अपेक्षित असाच होता. काँग्रेसने २०१४ पासून लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील एवढे पराभव पचवले की, त्याची त्यांना आता सवय झाली आहे. विशेष म्हणजे या पराभवाला काँग्रेस आणि काँग्रेसच जबाबदार आहे. काँग्रेसची एकूणच कार्यपद्धती ही सुरुवातीपासूनच वेगळी आहे. लोकशाहीचा आव आणणाऱ्या काँग्रेसमध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही नाही तर घराणेशाही आहे. काँग्रेसचे नेतृत्व करणारे गांधी घराणे हे एखाद्या राजासारखे आहे. राजानंतर त्याचा मुलगा राजा होता, मुलानंतर त्यांचा मुलगा... असेच काँग्रेसमध्ये विशेषतः गांधी घराण्यात आजपर्यंत चालत आले, आताही चालत आहे.

काँग्रेसने प्रत्येक राज्यात आपले सरदार उभे केले. या सरदारांनी आपल्या निष्ठा राजाच्या म्हणजे गांधी घराण्याच्या चरणी वाहिल्या होत्या. या सरदारांनी राज्याराज्यांत आपला प्रभाव निर्माण केला आणि त्याच्या माध्यमातून सत्ता मिळवली. ही सरदारशाही जशी एकवेळ काँग्रेस पक्षाची जमेची बाजू होती, तशीच ती कालांतराने तिची डोकेदुखी झाली. काही काळ या सरदारांनी आपल्या प्रभावाने राज्यात काँग्रेसला सत्तेवर आणले. नंतर या सरदारांना आव्हान देणारे छोटे-मोठे सरदार त्या त्या राज्यात निर्माण झाले, त्याची परिणती गटबाजीत झाली. आज काँग्रेसचा विविध राज्यांतील विधानसभा निवडणुकीत होत असलेला पराभव हा त्यांच्या सरदारांचा आपापल्या राज्यातील प्रभाव आणि महत्त्व संपल्याचे द्योतक आहे. हरयाणात काँग्रेसचा झालेला पराभव हा राज्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुडा यांचा पराभव आहे. हुडा यांना तिसऱ्यांदा मुख्यमंत्री व्हायचे होते; पण झाले उलटे. भाजपाने सलग तिसऱ्यांदा सत्तेवर येण्याची हॅट्‌ट्रिक करत काँग्रेसला जबर धक्का दिला. हरयाणात काँग्रेसला अतिआत्मविश्वास नडला. आपण सत्तेवर आलोच असे सर्व काँग्रेस नेते मानून होते, त्यामुळे हुडापासून कुमार शैलजा आणि रणदीप सुर्जेवाला यांनी मुख्यमंत्रिपदावर दावा सुरू केला होता. काँग्रेस पक्ष आणि हरयाणातील त्यांच्या नेत्यांची स्थिती बाजारात तुरी आणि... सारखी झाली होती. आपसातील गटबाजीने काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. सर्वात महत्त्वाचे राज्यातील ज्येष्ठ नेत्यांच्या अंतर्गत गटबाजीवर काँग्रेसच्या नेतृत्वाला नियंत्रण ठेवता आले नाही. या नेत्यांमध्ये समन्वय प्रस्थापित करता आला नाही. राहुल गांधींनी हरयाणातील एका प्रचारसभेच्या व्यासपीठावर मुख्यमंत्रिपदाचे दावेदार असणाऱ्या हुडा आणि शैलजा या दोन नेत्यांचे हात हातात मिळवण्याचा प्रयत्न केला, पण तोपर्यंत उशीर झाला होता. तिकीट वाटपात हुडा समर्थकांना मिळालेले झुकते माप आणि प्रचारात हुडांना मिळत असलेले महत्त्व पाहून शैलजा यांनी प्रचारापासून स्वतःला दूर ठेवले. प्रचाराच्या ऐन मोक्याच्या वेळी जवळपास १०-१२ दिवस शैलजा दिल्लीतील आपल्या निवासस्थानी बसल्या होत्या. पण शैलजा यांच्या नाराजीची चाहुल काँग्रेसच्या दिल्लीतील एकाही नेत्याला लागली नाही वा लागूनही त्यांनी त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले, हे सांगणे कठीण आहे. शैलजा या राज्यातील प्रमुख दलित नेत्या होत्या. पण त्यांची नाराजी दूर करणे काँग्रेसच्या नेतृत्वाला आवश्यक वाटले नाही. आणिबाणीत पराभव झाल्यानंतर बेलछीतील दलितांच्या हत्याकांडानेच इंदिरा गांधींचा सत्तेत परतण्याचा मार्ग प्रशस्त केला होता. आज हरयाणात दलितांची नाराजीच काँग्रेस पक्षाला भोवली आहे. हरयाणातील काँग्रेसचा पराभव हा पक्षांतर्गत गटबाजीने झालेला पहिला पराभव म्हणता येणार नाही. याआधी मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमधील विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसचा पराभव झाला. ज्याप्रमाणे हरयाणात काँग्रेस सत्तेवर येईल, असे सर्वांना वाटत होते, तसेच मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्येही काँग्रेस सत्तेवर येईल, असे सर्वांना वाटत होते. पण हरयाणाप्रमाणे भाजपाने या तिन्ही राज्यांत काँग्रेसचा पराभव केला. यामुळे ससा आणि कासवाची गोष्ट सहजपणे आठवते. जिंकण्याची सहज क्षमता असणारा ससा हरतो आणि जिंकण्याची बिलकूल क्षमता नसलेला कासव आपल्या सातत्यपूर्ण आणि चिकाटीच्या प्रयत्नाने शर्यत जिंकतो, असे याठिकाणी झाले. मध्यप्रदेशात काँग्रेस जिंकणार आणि कमलनाथ मुख्यमंत्री होणार असे वातावरण काँग्रेसनेच निवडणुकीदरम्यान तयार केले होते; प्रत्यक्षात त्या राज्यात काँग्रेसचा दारुण पराभव झाला. कमलनाथ स्वतःही निवडणुकीत पराभूत झाले. राज्यातील काँग्रेसच्या पराभवात अतिआत्मविश्वासाचा तसेच कमलनाथ यांच्या पक्षांतर्गत विरोधकांचा मोठा हात होता. तीच स्थिती



छत्तीसगडमध्येही झाली. त्या ठिकाणीही काँग्रेस जिंकणार आणि भूपेश बघेल पुन्हा एकदा मुख्यमंत्री होणार, असे वातावरण निर्माण करण्यात आले होते. पण त्या राज्यातही काँग्रेस तोंडघशी पडली. राजस्थानमध्येही यापेक्षा वेगळी काही घडले नाही. त्याठिकाणी तत्कालीन मुख्यमंत्री अशोक गहलोत आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांच्यात जोरदार जुंपली होती. मुख्यमंत्र्यांच्या ईर्ष्येने पायलट यांना आपले प्रदेश काँग्रेस अध्यक्षपद आणि उपमुख्यमंत्रिपदही गमवावे लागले. मात्र त्यांनी माघार घेतली नाही. अशोक गहलोत आणि काँग्रेसचा विधानसभा निवडणुकीत पराभव करूनच ते शांत झाले. काँग्रेसचा पराभव झाला यापेक्षा मध्यप्रदेशात कमलनाथ मुख्यमंत्री होऊ शकले नाही, याचे समाधान त्यांच्या पक्षांतर्गत विरोधकांना झाले. छत्तीसगडमध्येही यापेक्षा वेगळे काही घडले नाही. काँग्रेसच्या पराभवापेक्षा भूपेश बघेल मुख्यमंत्री झाले नाही, याचा आनंद त्यांच्या पक्षांतर्गत विरोधकांना होता. हरयाणात यापेक्षा वेगळे काही झाले नाही. कुमारी शैलजा आणि रणदीप सुर्जेवाला यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होण्याच्या भूपेंद्रसिंह हुडा यांच्या स्वप्नावर यमुना सतलज कालव्याचे पाणी फेरले. याचा अर्थ काँग्रेसच्या पराभवात त्या राज्यातील काँग्रेसी मुख्यमंत्र्यांच्या पक्षांतर्गत विरोधकांचा हात असला, तरी भाजपाच्या नेतृत्वाच्या निवडणुकीतील विजयाच्या कौशल्याचे महत्त्व कमी होत नाही. भाजपाच्या नेतृत्वाने शेवटच्या क्षणापर्यंत हार मानली नाही. आपली विजिगीषू वृत्ती आणि भावना कायम ठेवली. त्यासाठी आपली पूर्ण ताकद पणाला लावली. एखाद्या निवडणुकीची तयारी कशी करायची, त्यासाठी सूक्ष्मातिसूक्ष्म नियोजन कसे करायचे, त्याची अंमलबजावणी कशी करायची आणि आपल्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना झोकून देत कामासाठी कसे प्रोत्साहित करायचे, याचे जे कौशल्य पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह तसेच भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याजवळ आहे, त्याला तोड नाही. म्हणून हरयाणातील भाजपाचा विजय हा उल्लेखनीय आहे. या विजयाने झारखंड आणि महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीतील भाजपाच्या विजयाचा पाया घातला आहे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### स्वतःमधील महिषासुर नष्ट करूया!

जन्माला आलेल्या प्रत्येक जीवामध्ये दोष आणि अहं असतात. त्याचे निर्मूलन होण्यासाठी साधना आणि प्रयत्न करायचे असतात. कारण त्यामुळे आपलीच अधोगती होत असते. प्रत्येकात षड्रिपू, हव्यास, आसक्ती, खोटारडेपणा, चोरी, टिंगलटवाळी करणे, फसवणूक करणे, वासना असे दोष आणि अहं असतातच. वेळप्रसंगी ते प्रकटही होतात. त्यामुळे अयोग्य विचारांची निर्मिती होते. अयोग्य विचार निर्माण झाल्यामुळे माणसाच्या मन आणि बुद्धीवर आवरण येते. त्यामुळे मनुष्याच्या हातून अयोग्य कृती होते. अशा अयोग्य कृतीमुळे कोणीतरी दुखावले जाते, कोणाचा तरी कळत-नकळत अपमान होतो, संबंधांमध्ये वितुष्ट येते, नातेसंबंध दुरावतात. मनुष्याची विवेकबुद्धी नष्ट होते. दुर्गादेवीने नऊ दिवस महिषासुराशी युद्ध करून त्याचा वध करून त्याला नष्ट केले. आपणही आपल्यामध्ये दोष आणि अहंरूपी जे महिषासुर आहेत त्यांना नष्ट करण्यासाठी योग्य प्रकारे साधना करूया, धर्माचरण करूयात, नामजप करूयात, ईश्वराच्या अनुसंधानात राहूयात. या नवरात्रीत दुर्गादेवीला शरण जाऊन आपल्यामधील महिषासुर तिने नष्ट करावा यासाठी प्रार्थना करूया...

**प्रकाश जोशी**/नागपूर

### अशा खिरापती काय कामाच्या?

वाचक पत्रे या स्तंभात मनोज वैद्य यांचे लाडक्या बहिणींची जबाबदारी वाढली हे पत्र वाचले. त्यात त्यांनी मतदार असणाऱ्या लाडक्या बहिणींना करून दिलेली जबाबदारीची जाणीव योग्यच आहे. मात्र... युती सरकारच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजना धडाक्यात राबविली, त्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांना जोमाने कामाला लावले. आपल्या या लाडक्या बहिणीसुद्धा १५०० रुपये मिळवण्यासाठी रांगेत लागल्या. त्याच काळात निवडणूक आयोगाने सुधारित मतदार यादीचे प्रारूप जाहीर केले आणि त्यात आपले नाव आहे की नाही याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन मतदारांना, पक्ष कार्यकर्त्यांना केले. काही त्रुटी असतील तर त्याची दुरुस्ती करून घेण्यासाठी मुदत दिली. पण या लाडक्या बहिणींचे नाव मतदार यादीत आहे का? हे बघणे मात्र त्या लाडक्या बहिणी तसेच नेते व कार्यकर्त्यांकडून दुर्लक्षित राहिले. आता जर या लाडक्या बहिणींचे नावच मतदार यादीत नसेल तर अशा खिरापती काय कामाच्या?

राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी मतदाराला आपण हाकू तशी वळणारी मेंढरे समजण्याची गल्लत करू नये. अशा विविध योजनांचे लाभार्थी मतदार मोठे हुशार आहेत. ते आपला स्वार्थ तत्परतेने साधून घेतात आणि मतदानाच्या दिवशी मात्र सुटी एन्जॉय करतात. वरून आमचे नावच नव्हते मतदार यादीत असे कारण सांगायला मोकळे. सरकार बदलले तशी ही योजना आणली असती आणि वेळीच प्रत्येक बुथच्या मतदार याद्यांमध्ये लक्षपूर्वक सुधारणा करवून घेतल्या असत्या तर कदाचित फायदा झाला असता. आता निवडणुकीच्या तोंडावर आणलेल्या योजना सत्ताधाऱ्यांना कितपत फायदेशीर ठरतील हा प्रश्नच आहे. अजूनही मतदार याद्यांमध्ये घोळ असल्यास आणि दुरुस्तीला वाव असल्यास त्याकडे पक्ष नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी तातडीने लक्ष घालायला हवे, असे सुचवावेसे वाटते. मुळात अशा मोफत-फुकटच्या सर्वपक्षीय योजनांच्या या खिरपतींनी दीनदयाल उपाध्यायांची अंत्योदय संकल्पना चुकीच्या वळणावर नेऊन ठेवली आहे, असेच म्हणायला हवे !

**प्रसाद द. पोफळी**/९८२२५६९६४८

### निवडणुकीतील दावे फोल!

देशातील सर्व वाहिन्यांच्या एक्झिट पोलने हरयाणात काँग्रेस पक्षाला स्पष्ट बहुमत दाखवत सत्ता मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार, शिवसेनेचे उद्धव ठाकरे, संजय राऊत यांच्या सारख्यांनीही हरयाणानंतर महाराष्ट्रात भाजपा हरणार, अशीच विधाने केली होती. प्रत्यक्षात विधानसभेचे निकाल हाती येत भाजपाला तिसऱ्यांदा हरयाणाची सत्तेची चाबी मिळाली असल्याने परत एकदा एक्झिट पोलचा अंदाज लोकसभेच्या निवडणुकीतील दाखवलेल्या अंदाजाप्रमाणे फोल ठरला. राष्ट्रवादी शरद पवार आणि संजय राऊत यांचे दावे सपशेल चुकीचे ठरले. यातून शरद पवार आणि संजय राऊत काही बोध घेतील का?

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### शिक्षणाचे माध्यम व्हावे

आमच्यासाठी मराठी भाषा ही अभिजातच होती. म्हणूनच आमच्या साहित्य परिषदेची आठ वर्षांआधीच 'अभिजात मराठी शिक्षक साहित्य परिषद' हे नाव देऊन स्थापना करण्यात आली आणि सातत्याने मराठी भाषा जतन व संवर्धनाचे कार्य अविरत सुरू आहे. अभिजात दर्जा मिळाला आहेच तेव्हा मराठी भाषा विकास महामंडळ स्थापन करून समितीत मराठी तज्ज्ञांची नेमणूक करावी. त्याचप्रमाणे मराठी भाषेला रोजगार मिळाला तर ती टिकेल आणि पुढील पिढीत संक्रमित होत जाईल. महत्त्वाचे असे की, किमान महाराष्ट्रात तरी सर्व प्रकारांच्या शाळांमध्ये मराठी भाषा ही शिक्षणाचे माध्यम व्हावे, ही अपेक्षा.

**किशोर तळोकार**/९६७३०६०७६२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



नवरात्री निमित्त शहरातील खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात जत्रा भरली आहे. यानिमित्त खंडेश्वरी देवीच्या दर्शनासह जत्रेचा आनंद घेण्यासाठी रोज हजारोंच्या संख्येने बीडकर गर्दी करत आहेत. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)

# बीड विधानसभा मतदार संघातील मुलभूत आणि जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आ.संदीप क्षीरसागर यांचे राज्यपालांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० ऑक्टोबर**

महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल श्री.सी.पी.राधाकृष्णन हे बुधवार दि.९ ऑक्टोबर २०२४ रोजी बीडच्या दौर्यावर होते. ते बीड येथे आले असता आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी राज्यपाल महोदयांची भेट घेवून बीड मतदार संघातील मुलभूत आणि जिव्हाळ्याच्या असलेल्या विविध प्रश्नांवर चर्चा केली व निवेदन दिले.

बीड मतदार संघातील विविध प्रश्न अनेक काळापासुन प्रलंबित आहेत. याचा पाठपुरावा शासन दरबारी सातत्याने चालू असुनही हे प्रश्न सुटत नाहीत. आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम हे या विषयात निरंतर पाठपुरावा करत असतात. बीड शहरातील नागरिकांसाठी मुलभूत असलेला पाणी पुरवठ्याचा प्रश्न अनेक वेळा शासनाकडे पाठपुरावा केल्यानंतरही सुटला नाही. शेवटी मा.उच्च न्यालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये याचिका दाखल करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी प्रयत्न केले. यावर मा.न्यायालयानेही या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेत शासनाला बीड शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी आर्थिक निधीची तरतुद करा असे निर्देश दिले आहेत. परंतु अद्यापपर्यंत तरी या समस्ये बाबत शासनाने दखल घेतलेली नाही. तसेच मा.न्यायालयाच्या निर्देशाचे पालन शासनाकडून झालेले नाही. या सोबतच बीड मतदार संघातील बिंदुसरा नदीवरील बीड शहरासाठी पाणी पुरवठा करणे करिता निम्न पातळी बंधारा करणे बाबत कार्यकारी संचालक,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विभाग,छत्रपती संभाजीनगर यांना उपसचिव,महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग यांनी दि.१०.११.२०२१ रोजी सदरील प्रक्रिया करण्याच्या मान्यतेसह आदेशीत केलेले आहे. तसेच निम्न पातळी बंधारा कम पुल करणेसाठी कामाचे सर्वेक्षण होवून प्रस्ताव व संकल्पन प्रस्ताव मध्यवर्ती चित्र संघटना नाशिक यांच्याकडून सादर होवून तो प्रस्ताव मान्य देखिल करण्यात आलेला आहे. सदरील बंधार्यासाठी ९५ टक्के विश्वासर्हतेने ३.२३ दलघमी येवा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र आहे. तसेच या प्रकल्पास आवश्यक ०.३५ दलघमी पाणी वापरामुळे कोणताही परिणाम दिसून येत नाही. तरी,मध्य गोदावरी खोर्यातील लवादानुसार पाणी वापर सुत्रानुसार प्रत्यक्ष पाणी वापर परगणित केल्यानुसार उपलब्ध होणाऱ्या मंजुर २.८० अब्ज घनफुट (टीएमसी) शिल्लक पाण्यामधुन या बंधार्याकरिता विशेष बाब म्हणुन सिंचनासाठी (पिण्यासाठी) ०.३५ दलघमी पाणी वापर प्रस्तावित केलेला आहे. तसेच टुकूर (खांडेपारगाव ता.बीड) येथील साठवण तलाव प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश सन २००३ रोजी पारीत झालेले आहेत. तत्कालीन वेळेला त्या प्रकल्पाची एकूण किंमत भुसंपादनासह १६ कोटी रूपये इतकी होती.आज ती किंमत किमान ३५० कोटी रूपयांच्या उपर जात आहे. आसपासच्या व सदरील गावातील शेतकर्यांच्या विरोधामुळे व होत असलेल्या गैरसोयीमुळे प्रशासकीय मान्यता



व कार्यारंभ आदेश ऑगस्ट २०२१ रोजी प्रशासनाकडून रद्द करण्यात आलेले आहे. ते रद्द होत असतांना त्याऐवजी एकूण ९ कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे होणे बाबत सुधारित सूचना देखिल प्रसारित करण्यात आलेली आहे. या बंधार्याच्या प्रकल्पामुळे १.७४ दलघमी पाणीसाठा उपलब्ध होवून सिंचन क्षेत्र ३९० हेक्टर ओलीताखाली येणार आहे. त्यासाठी आजमित्तीला २२० कोटीच्या दरम्यान प्रशासकीय खर्च लागणार आहे या बाबत राज्य शासन आर्थिक तरतुद करू शकते आणि यातुन बीड मतदार संघातील नागरिकांची अनेक दिवसांपासून असलेली मागणी पुर्ण होईल आणि या भागातील शेतकरी बांधव यांच्या सिंचनाचा व नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागेल.



महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन बीड जिल्हा दौऱ्यावर असताना, शासकीय विश्राम बीड येथे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

# रेशीमउत्पादक शेतकरी शिवराज फाटे यांना शासनाचा रेशीमरत्न पुरस्कार

## अमरावतीमध्ये झाला मान्यवरांच्या हस्ते फाटे दाम्पत्याचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१० ऑक्टोबर**

तालुक्यातील टकारवाडी येथील रेशीम उत्पादक शेतकरी शिवराज धर्मराज फाटे यांचा महाराष्ट्र शासनाच्या रेशीमरत्न पुरस्काराने दि. ७ सोमवारी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांचे सह विवीध मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सन्मान करण्यात आला.

तालुक्यातील टकारवाडी येथील शेतकरी शिवराज फाटे या शेतकऱ्याने मागील दहा वर्षांपासुन कोष उत्पादनात आघाडीचे उत्पन्न घेत भरीव कामगिरी केली तर तालुक्यासह इतर तालुक्यातील शेतकऱ्यांना रेशीम शेती करण्यासाठी मोफत माहिती देउन रेशीम शेती करण्यासाठी प्रोत्साहीत केले. याची दखल घेत राज्य शासनाने शिवराज फाटे यांना २०२२ - २०२३ चा रेशीमरत्न पुरस्कार अमरावती येथे वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील, खा. डॉ. अनिल बोंडे, नागपूरचे रेशीम संचालनालयाचे उपसंचालक डॉ. महिंद्र ढवळे, बीड जिल्हा रेशीम विकास अधिकारी शंकर वराट, अविनाश कुटे, रो.हि.ओ. तांत्रिक अधिकारी विकास मस्के यांच्या हस्ते शिवराज फाटे व सौ. छाया फाटे या दाम्पत्याचा पुरस्कार देउन सन्मान करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देतांना शेतकरी शिवराज फाटे म्हणाले की, शेती परवडत नाही अशी अनेक शेतक-यांची ओरड आहे परंतु शेतीमध्ये नव - नविन व वेगवेगळे प्रयोग केल्यास निश्चीतच शेती किफायतशीर व फायदेशीर ठरते. त्यामुळे शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगीतले. शिवराज फाटे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे मित्रपरिवार, नातेवाईक व सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र सरकारचे अभिनंदन-वसुदेव गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१० ऑक्टोबर**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिल्याबद्दल केंद्र सरकारने मनापासून अभिनंदन व आभारही असे मत जेष्ठ विचारवंत, नेस्ठ समाजसेवक, आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचलय, आनंदगांव ता. केज. जि. बीड चे संस्थापक वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी व्यक्त केले.



२०१३ मध्ये राज्य सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केंद्र सरकार कडे शिफारस केली होती.

त्या आधारे २०२४ मध्ये केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला त्याबददूल केंद्र सरकारचे व राज्य सरकारचेही विशेष अभिनंदन व आभार वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी व्यक्त केले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारचा मोठा निधी यापुढे मिळत राहील व मराठी भाषेच्या विकासाला निश्चित चालना मिळेल यात आता तिळमात्र शंका नाही.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेची भरभराट होईल म्हणून केंद्र सरकारचे विषेश अभिनंदन व आभार वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी व्यक्त केले आहे.

# अखिल भारतीय पाचवी बौद्ध धम्मपरिषदेस मोठ्याने उपस्थित रहा-कचरूजी खळगे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१० ऑक्टोबर**

या वर्ष धम्मसंस्कार संस्था ,बीड व बीड येथील समस्त बौद्ध उपासक-उपासिका यांच्या बीड शिक्षण महाविहार धम्म शांती डॉ.भदन्त आनंद कौसल्यान नगर शिवणी येथे ६९ धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या अखिल भारतीय बौद्ध धम्माचे बौद्ध धर्मगुरू येत्या शनिवार दिनांक १२ तारखेला आले आहे. या सहजसद्घाटक म्हणून पुभिखु धम्मसेवक महारो (अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश भिक्खु संघ) उक्थे अधिकार लाभणार आहे. विशेष अतिथी म्हणून श्रीलंका येथील राष्ट्रपतीचे धार्मिक सल्लागार मा.खा.पु. भदन्त अतुरलीय रतन महाथेरो (कोलंबो, श्रीलंका) विजय सीमा सीमा आहे. या धम्मपरीषदेचे अध्यक्ष पु.भिक्खु इंदवंस महाथेरो (कुशीनगर) हे प्रमुख धम्मदेसना पु.भिक्खु करुणानंद थेरो संभाजीनगर, भिक्खु डॉ.इन्दवंस महाथेरो कुशीनगर, पु.भिक्खु विज्ञप्तीस थेरोपज्ञ थेरोचा सिरसाळा, पु.भिक्खु, थेरोपज्ञ थेरोपज्ञ थेरोचा सिरसाळा. नांदेड, पु.भिक्खु पज्ञाबोधी थेरो नांदेड, पु.भिक्खु धम्म सुगाता नागपुर, पु.भिक्खु बुद्धघोष हिंगोली, पु.भिक्खु चंद्रमुनी हिंगोली, पु.भिक्खु पज्ञावर्धन हिंगोली, पु.भिक्खु नागसे अनुभव संभाजीनगर प्रमुख धम्मदेह होणार प्रमुख प्रमुख म्हणून विभागीय शिक्षण उपसंहार चालक संभाजीनगर अनिल साबळे, संगीत प्रमुख विभाग स.भु. अगदी छ. संभाजीनगर प्रो.डॉ. संजय मोहभागीय अधिकारी मागाव गौरव इंगोले, साहब ही उपविभागीय व्यवस्था आहे. ही अखिल पाचवी बौद्ध धम्मपरिषद प्रमुख दिग्दर्शक डॉ.भिक्खु उपगुरु महाथेरो पुराणा यांच्या मार्गदर्शन पार पडेल आणि धम्म पूर्णस बौद्ध उपासक, उपासिका यांनी मोठ्या भारतीयाने उपस्थित राहावे असे आवाहन मुख्य संयोजक पु. भिक्खु धम्मशील थेरो हिंगोली/ बीड, स्वागताध्यक्ष डॉ. सुनील सरवदे (चेअरमन माऊली मल्टीस्टेट, नाशिक) यांनी केले आहे.



या कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे शनिवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी ८.०० वा. डॉ. आंबेडकर सामजिक न्याय भवन बुद्धमुर्तीसह डॉ. बाबासाहेब मिर संघ, भिक्खु उपासक, उपासिका आशा धम्म नुकीस प्रारंभ होईल. मिरवणुकीचा मार्ग डॉ. बाबासाहेब सामाजिक न्याय भवन- शिवाजी महाराज पुतळा कारंजा बलभीम चौक टिळक रोड सुभाष रोड डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक असून येथे अभिवादन व धम्मध्वजारोहन करून नाळवंडी नाका- ते शिवणी येथे मिरवणुकीचा समारोप होणार आहे.

१२ जून रोजी मौजे शिवणी येथे १०.०० वा. ऐतिहासिक बोधीवृक्षाची पुजा आधिक पु.भिक्खु पज्ञाबोधी थेरो (अध्यक्ष नांदेड, जिल्हा भिक्खु संघ) यांच्या मुख्य धम्मध्वजारोहन होणार आहे. ते १० ते १२.०० यावेळेत भिम व बुद्ध गीतांचा सांकृतीक कार्यक्रम व मुख्य कार्यक्रम उदघाटन १२-०० शांत होणार नाही.अशी माहिती मुख्य संयोजक सचिव प्रियदर्शी धम्मसंकार संस्था,बीड पु. भिक्खु धम्मशील थेरो हिंगोली/बीड स्वागताध्यक्ष डॉ. सुनील सरवदे (चेअरमन माऊली मल्टीस्टेट, नाशिक) यांनी दिली आहे. बौद्ध उपासक उपासकांनी मोठ्याने उपस्थित राहावे असे आवाहन कचरूजी खळगे यांनी केले आहे.

# श्रमप्रतिष्ठा व स्वावलंबाने माणूस जीवनात यशस्वी होतो

## -विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रीय शिक्षक प्रतिनिधी श्री उमेश जगताप सर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० ऑक्टोबर**

दि.१० ऑक्टोबर रोजी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित,स्वा. सावरकर प्राथमिक विद्यालयात विस्तार सेवा कार्य विभागाच्या अंतर्गत श्रमप्रतिष्ठा व स्वावलंबनाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर मागदर्शक म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रीय शिक्षक सदस्य श्री उमेश जगताप सर, अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप जोशी



सर, विभाग प्रमुख श्री. सचिन सानप सर व विस्तार सेवा कार्य प्रमुख श्री.सचिन बारगजे सर यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सचिन बारगजे सर यांनी केले. मागदर्शक म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रीय शिक्षक प्रतिनिधी श्री उमेश जगताप सर यांनी श्रमप्रतिष्ठा व स्वावलंबन माणसाच्या जीवनात किती महत्त्वाचे आहे हे सांगितले.तसेच कार्यानुभव विषया अंतर्गत दिवाळी सणाच्या निमित्ताने आकाशकंदील बनवणे ही स्पर्धा श्रीमती.पल्लवी खंबायते यांच्या मार्गदर्शनाने घेण्यात आली.त्यामध्ये प्रथम कु.देवांगी रंगदळ, द्वितीय कु.जान्हवी जोजारे, तृतीय कु.राधिका जाधव हिने क्रमांक पटकविले.यावेळी नवरात्र उत्सव निमित्त कु.समृध्दी बीडकर हिने महिषासुरमर्दिनी स्त्रोत्र सादर केले. अध्यक्ष समारोपात श्री प्रदीप जोशी सरांनी श्रमप्रतिष्ठा व स्वावलंबन यावर विद्यार्थ्यांना गोष्टींचा स्वरूपात माहिति सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.योगेश दातीर सर यांनी केले व सर्व शिक्षकांच्या सहकार्याने कार्यक्रम संपन्न झाला.

# केजच्या स्मार्ट श्रीमती विजेत्या रेश्मा बांगर तर उपविजेत्या सुनीता राऊत

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१० ऑक्टोबर**

केज रोटरी तर्फे दरवर्षी नवरात्र महोत्सवानिमित्त घेतल्या जाणाऱ्या केज स्मार्ट श्रीमती स्पर्धेत केजच्या रेश्मा जीवन बांगर यांनी प्रथम क्रमांक मिळवून केज स्मार्ट श्रीमती बनण्याचा बहुमान मिळवला तर सुनीता संतोष राऊत यांनी उपविजेतेपद पटकावले. विजेत्यांना डिस्ट्रिक्ट पब्लिक इमेज डायरेक्टर रवींद्र बनकर, रो किशोर दाताळ, केज रोटरी अध्यक्ष प्रकाश कामाजी, हनुमंत भोसले, प्रवीण देशपांडे, अरुण अंजाण, दादाराव जमाले पाटील सुशील टोपे व नगराध्यक्षा सीता बनसोड यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

रोटरी क्लब ऑफ केज आणि भवानी माता उत्सव समितीच्या वतीने ही स्पर्धा मंगळवारी भवानी मंदिर प्रांगणात पार पडली. या स्पर्धेत विविध खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत २०० महिलांनी सहभाग नोंदवला होता. निवडफेरी सह इतर चार फेऱ्यानंतर अंतिम फेरी पार पडली. या स्पर्धेत २० पैकी १९ गुण मिळवून रेश्मा जीवन बांगर या प्रथम स्थानी आल्या तर सुनीता संतोष राऊत या दुसऱ्या क्रमांकावर राहिल्या. या स्पर्धेत केजची मयुरी संतोष राऊत या केजच्या कन्येने आपल्या नोकरीच्या पहिल्या पगारातून पहिल्या चार विजेत्यांना चार पैठणी भेट दिल्या. याबद्दल तिचे कौतुक होत आहे. या स्पर्धेसाठी गिरीराज कलेक्शन, मैत्री कलेक्शन, अभिजित कलेक्शन, कोहिनुर कलेक्शन, अतुल प्रोव्हिजन्स, पांडुरंग मिटकरी, सुरभी एम्पोरियम, पारस मयूर स्वीट होम, व्यंकटेश स्टील सेंटर यांनी विजेत्यांना भेटवस्तू दिल्या. हनुमंत भोसले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष प्रकाश कामाजी यांच्यासह रो अरुण अंजाण, दादाराव जमाले पाटील, प्रवीण देशपांडे, सूर्यकांत चवरे यांनी विशेष परिश्रम घेतले.



# हळद संशोधन केंद्राला ७०९ कोटी निधी मंजूर

## माजी खासदार हेमंत पाटील यांची पत्रकार परिषदेत माहीती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० आक्टोबर**

जिल्ह्यातील वसमत येथील मा बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्राला ७०९ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून इतरही महत्वाचे निर्णय आज झालेल्या मंत्रीमंडळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आल्याची माहीती माजी खा हेमंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वसमत येथील हळद संशोधन केंद्रासाठी माजी खा हेमंत पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. मुंबई येथे दि २४ जूलै रोजी झालेल्या महत्वपूर्ण बैठकीत हळद संशोधन केंद्रासाठी निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये १०० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता त्यानंतर दि ११ आक्टोबर रौी झालेल्या बैठकीत ७०९ कोटींचा निधी मंजुर करण्यात आला आहे. संशोधन केंद्रासाठी ७५ पदे मंजुर करण्यात आली असून ५० पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणार आहेत. यासाठी आकृतीबंधास उच्चाधिकार समितची मान्यता घेण्यात येणार आहे. सदरील प्रकल्प वॉर रूम प्रकल्पात घेण्यात आला असून राज्याचा प्रमुख कार्यक्रम म्हणून राबविण्यात येणार आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे आनंदाचा शिधाा या योजनेंतर्गत दरवर्षी किमान २ किलो हळद पावडरचा पुरवठा करण्यात येणार आहे तसेच अंगणवाडी आणि प्राथमिक शाळेतील मुलांना हळदयुक्त दुधाचा पुरवठा करण्यात येणार आहे. हळद संशोधन केंद्रास निधी वितरण करावयाच्या प्रचलीत कार्यपध्दतीत आवश्यक ते बदल करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. याशिवाय हळद संशोधन केंद्रावरील प्रक्रिया केंद्र आणि विकीरण केंद्राचे काम प्राधान्याने फास्ट ट्रॅकवर पूर्ण करण्याचे आदेशही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्याची माहीती माजी खा हेमंत पाटील यांनी दिली आहे.

## आ. तान्हाजी मुटकुळे उपचारासाठी मुंबईला हलविले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० आक्टोबर**

हिंगोली विधानसभेचे भारतीय जनता पक्षाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांना ऱ्हदयाच्या ठोक्याचा त्रास होत असल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉ. यशवंत पवार यांनी सांगितले आहे. मागील काही दिवसांपूर्वी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांना छातील दुखत असल्यामुळे त्यांना हिंगोली येथील सह्याद्री हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. याठिकाणी डॉ यशवंत पवार यांच्या मार्गदर्शनात त्यांच्यावर उपचार सुरू होते. दि १० आक्टोबर रोजी त्यांच्या ऱ्हदयाचे ठोके अनियमित होत असल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी दुपारी मुंबई येथील रूग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे. नांदेड येथून विमानाने ते मुंबईला रवाना झाले आहेत. आ. मुटकुळे यांची प्रकृती स्थिर असून त्यांना चेकअपसाठी मुंबई येथे हलविण्यात आले असल्याचे डॉ यशवंत पवार यांनी सांगितले आहे.

# औंढा तालुक्यात ९४१ घरकुलांना मंजूरी- गटविकास अधिकारी

## ९३५ लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १० आक्टोबर**

तालुक्यातील ग्रामीण भागासाठी असलेल्या प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ऑगस्ट २०२४ मध्ये एकूण ३ हजार ७७७ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यापैकी ९४१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली. परंतु त्यापैकी पूर्वी इतर योजनेतून घरकुल घेतलेल्या ४६१ लाभार्थ्यांचे घरकुल पंचायत समिती मार्फत रद्द करण्यात आले आहेत. तर कुंटुबातील इतर व्यक्तीला लाभ देण्यात आलेला असल्याने अनेकांची नावे आपोआपच मंजूर झालेल्या यादी मधून कमी होत आहेत. अशी माहिती औंढा नागनाथ येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोपाळ कलारे यांनी दिली.

गेल्या अनेक वर्षापासून प्रतीक्षेत असलेल्या औंढा नागनाथ तालुक्यातील प्रपत्र ड मधील ३ हजार ७७७ घरकुल लाभार्थ्यांना प्रधानमंत्रीआवास योजने अंतर्गत लाभ देण्यात आला आहे. तालुक्यातील मागास प्रवर्गातून २ हजार २०० तर इतर प्रवर्गातून १ हजार ४२६ लाभार्थ्यांची निवड करण्यात आल्यामुळे त्यांना आता हक्काचे घर मिळणार आहे. २०१६ मध्ये घरकुलासाठी पात्र असणाऱ्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करून प्रपत्र ड मध्ये त्यांचा समावेश करून मंजुरीस्तव यादी पाठवण्यात आली होती. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तालुक्यात ३ हजार ७७७ लाभधारकांनी निवड करण्यात आली आहे. त्यापैकी आतापर्यंत १ हजार ८३५ घरकुल धारकाना पंचायत समिती कार्यालय तर्फे मंजुरी देण्यात आली तर ९३५ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वाटप करण्यात आला असल्याची असल्याची माहिती गट विकास अधिकारी गोपाल कल्हारे यांनी दिली. मंजूर झालेल्या घरकुल पैकी यापूर्वी विविध योजनेतून लाभ घेतलेल्या ४६१ लाभार्थ्यांचे घरकुल रद्द करण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. पहिला हप्ता न भेटलेल्या घरकुल उर्वरित पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक ती कागदपत्रे पंचायत समिती कार्यालयात किंवा ग्रामविकास अधिकाऱ्यांकडे त्वरित जमा करून घरकुलाचा पहिला हप्ता खात्यात वर्ग करून घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यापूर्वी ज्या कुटुंबामध्ये घरकुल योजनेचा लाभ मिळाला आहे आणि आता कुटुंब फोडून मंजूर झालेले घरकुल जर मिळाले असेल तर बहुतांश घरकुले रद्द होऊन इतरत्र वळविल्या जाणार आहेत किंबहुना पात्र लाभ धारकांच्या यादीमध्ये इतर गावांमध्ये जर शिल्लक लाभधारक असतील तर अशा लाभधारकांना घरकुलांचा लाभ मिळणार. त्यामुळे एक वेळेस लाभ घेतलेल्या कुटुंबास पुन्हा घरकुलाचा लाभ घेता येणार नसल्याचेही त्यांनी यावेळी गटविकास अधिकारी कलारे यांनी सांगितले.



**हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मागील तीन दिवसांपासून ईसापूर, येलदरी आणि सिध्देश्वर धरणग्रस्तांचे अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. गुरूवारी ॲड सचिन नाईक यांनी धरणग्रस्तांची भेट घेत त्यांची विचारपूस केली असून प्रशासन आणि शासनाने तत्काळ धरणग्रस्तांच्या मागण्यां मान्य कराव्यात अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. छाया- विजय गुंडेकर**

# राष्ट्रीय पोषण अभियानात हिंगोली जिल्हा राज्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० आक्टोबर**

राष्ट्रीय पोषण अभियानात हिंगोली जिल्ह्याने ११९७ अंगणवाड्यातून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून तब्बल १८ लाख नोदी घेत राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या कामगिरीबद्दल जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचा शुक्रवारी मुंबई येथे एका विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात येणार आहे.

राज्यात महिला व बालकल्याण विभागाच्यामार्फत अंगणवाड्यामधून सप्टेंबर महिन्यात पोषण माह राबविण्यात आला. यामध्ये १ लाख अंगणवाड्यामधून विविध उपक्रम राबवून त्याच्या नोंदी घेण्याच्या सूचना आयुक्त कार्यालयाने दिल्या होत्या. या उपक्रमात अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्यासोबतच गरोदर व स्तनदा मातांसाठी मार्गदर्शन, दररोज नवीन रेसीपीच्या माध्यमातून बालकांना पोषण आहार देणे यासह इतर उपक्रमांचा समावेश होता.

हिंगोली जिल्ह्यात जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी सहा प्रकल्पांमधील अंगणवाड्यामधून उपकि राबविण्यास सुरूवात केली होती. हिंगोली जिल्ह्यातील ११९७ अंगणवाड्यांमधून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून तब्बल १८ लाख उपक्रमांची ऑनलाईन नोंद घेतली आहे. सर्वाज जास्त उपक्रम व नोंदी घेत हिंगोली जिल्ह्याने राज्यात पहिला क्रमांक मिळवला आहे.

मुंबई येथील भायखळा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात शुक्रवार दि ११ आक्टोबर रोजी महिला व बालविकास मंत्री आदीती तटकरे यांच्याहस्ते जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांचा सत्कारकेला जाणार आहे.

जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने यापूर्वीही आयुक्तालयाकडून दिलेल्या सुचनांनुसार कामे करून सरस कामगिरी केली आहे. त्यामध्ये आधार व्हेरीफिकेशन, एकसमान रंगरंगोटी, धुरमुक्त अंगणवाडी, पोषण ट्रॅकरमध्येही यापूर्वी राज्यस्तरीय पुरस्कार मिळवले आहेत.

दरम्यान, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांचे जिल्हाधिकारी अभिवन गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांनी अभिनंदन केले आहे. तर गणेश वाघ यांनी अंगणवाडीमध्ये काम करणाऱ्या सर्व महिला कर्मचाऱ्यांचे कौतूक केले आहे.

# शेख नईम शेख लाल यांची प्रदेश काँग्रेसच्या अल्पसंख्यांक महासचिव निवड




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० आक्टोबर**

माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या प्रस्तावावरून महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष (अल्पसंख्यांक) डॉ. अथर वजाहत मिर्झा, यांच्या शिफारशिवर ऑल इंडिया काँग्रेस काँग्रेस कमेटी,(अल्पसंख्यांक) नवी दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. इम्रान प्रतापगडी यांच्या मान्यतेने मो. अहमद खान राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र व मुंबई चे प्रभारी ऑल इंडिया काँग्रेस कमेटी (अल्पसंख्यांक ), नवी दिल्ली यांनी शेख नईम शेख लाल यांची महाराष्ट्र प्रदेश (अल्पसंख्यांक) महासचिवपदी निवड केल्याचे पत्र देण्यात आले.

या निवडीबद्दल माजी आ.भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी त्यांच्या निवासस्थानी शेख नईम शेख लाल यांचा सत्कार केला. यावेळी सुनील पाटील गोरेगावकर, रणजित पाटील गोरेगावकर, शहर अध्यक्ष पवन उपाध्याय, बाबुराव भिसे, मदन पाटील, रंगनाथ पाटील, अमर शुक्ला, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हा अध्यक्ष साद अहमद, शेख नौमान नवेद, आबीद अली खान, आकाश जगताप, अक्षय डाखोरे, विराट जिल्हाध्यक्ष, जिल्हा प्रमुख महाचिव, उपाध्यक्ष, शहर अध्यक्ष, व पदाधिकारी शेख बासित, पठाण साजिद खान, शेख शाहनवाज, शेख अवेज, सतीश लोणकर, राजकुमार जावळे, आमेर अली, नितीन तपासे शेख अफरोज, खालिद पटेल सय्यद मुनवर,सय्यद गौस, मो. परवेज, कलीम खान,शेख अतिक शेख लाल, पठाण युसूफ खान,मो. फैजान,शेख उबैद, शेख आकिब आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### सर्वोदयी विचारवंत गंगाप्रसाद अग्रवाल यांची सहावी पुण्यतिथी, विविध कार्यक्रमांचे आयोजन



हिंगोली- स्वातंत्र्यसेनानी तथा सर्वोदय विचारवंत गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्या सहाव्या पुण्यतिथी निमित्ताने जिल्ह्यातील हिंगोली, वसमत येथे दिनांक ११ ऑक्टोबर शुक्रवारी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, नशामुक्त भारत अभियान, एकात्मिक आदिवासी विकास विभाग-कळमनुरी, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमानने, पुण्यतिथी निमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वसमत येथे सकाळी सहा वाजता सर्वधर्मप्रार्थनेचे आयोजन करण्यात आले आहे. हिंगोली तालुक्यातील आदिवासी आश्रम शाळेत सद्भावना संकल्प, व्यसनमुक्ती प्रतिज्ञा, नशामुक्ती चित्र प्रदर्शनाचे आयोजन राष्ट्रपिता महात्मा गांधी सप्ताहाचा समारोप आदी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे समर्पित सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, जिल्हाध्यक्ष शुभदा सरोदे म्हणाल्या.

### काँग्रेसच्या सोशल मिडीया जिल्हाध्यक्षपदी शेळके



हिंगोली- महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या मान्यतेने व महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया अध्यक्ष विशाल मूत्तेमवार व माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या नेतृत्वात मदन शेळके यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सोशल मीडिया हिंगोली जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडी बद्दल माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सूनिल पाटील गोरेगावकर, यूवा नेते रणजित पाटील गोरेगावकर, तालुका अध्यक्ष भास्करराव बेंगाळ, हिंगोली तालुका अध्यक्ष बापूराव पाटील,शहर अध्यक्ष पवन उपाध्ये, संजय भैय्या देशमुख, तसेच हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी यांनी निवडीचे अभिनंदन केले.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

हिंगोली- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका केंद्र येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी येथील विदयार्थी सारंग शिंदे हे राज्य उत्पादन शुल्क (दारूबंदी पोलीस) या पदावर निवड झाली आहे. अजू सिंघ टाक यांची नागपूर राज्य राखीव दल येथे नियुक्ती झाली. यावेळी बिरजू यादव व अभ्यासिका येथील संचालक अशितोश शेंडे, परमेश्वर शेंडे, सतीश शेंडे, दयाल यादव, राजेश कांबळे व विद्यार्थी उपस्थित होते.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप अभियंत्यास शिवीगाळ, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० आक्टोबर**

येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप अभियंत्यास मार्क आऊट देण्याच्या कारणावरून शिवीगाळ करून धमकी देणाऱ्या चौघांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव तालुक्यातील साखरा ते जयपूर या रस्त्याचे काम मंजूर झाले होते. या कामांसाठी सुमारे ४५ लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम उपविभागाने या कामाचे अंदाज पत्रक तयार करून त्याच्या निवीदा देखील काढल्या होत्या. सदर निवीदेमध्ये नांदेड येथील कंत्राटदारास कंत्राट मिळाले होते. त्यानुसार बांधकाम उपविभागाने कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश देखील दिले होते. मात्र कार्यारंभ आदेश देऊन सुमारे पाच महिन्याचा कालावधी लोटला तरी सदरील कामाला सुरूवात झालीच नाही. त्यामुळे उपअभियंता माधव देशमुख यांनी संबंधित कंत्राटदारास नोटीस पाठवून काम का सुरू केले नाही तसेच काम का रद्द करण्यात येऊ नये याचा खुलासा मागविला होता.

दरम्यान, उपअभियंता माधव देशमुख हे बुधवारी दि ९ आक्टोबर रोजी कामकाज करीत असतांना शेख वाजीद व अन्य तिघे जण तेथे आले. तुम्ही शेख हैदर मोहम्मद हाजी रा सुंदर नगर हनुमान गढ तरोडा बु. यांनी घेतलेल्या कामाचे आजपर्यंत सुरू न केलेल्या कामाची वर्क ऑर्डर घेवून आले. कार्यारंभ आदेश दिलेल्या कामाचे मार्क आऊट का दिले नाही अशी विचारणा करून आत्ताच मार्क आऊट द्या असे म्हणत शिवीगाळ केली तसेच तुम्हाला बघून घेतो अशी धमकीही दिली.

याप्रकरणी उपअभियंता देशमुख यांनी दि १० आक्टोबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी विरूध्द कलम २२१, ३५२, ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गुंज शिवारात शेतमजुराची आर्थिक विवंचनेतून आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० आक्टोबर**

वसमत तालुक्यातील गुंज शिवारात मुलाचे आजारपण व बचतगटाचे पैसे कसे भरावे या चिंतेमुळे एका तरूण शेतमजुराने गुंज शिवारात गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात दि ९ आक्टोबर रोजी अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार गुंज येथील मल्हारी बाळू वाहूळकर वय ३८ हे शेतात रोजमजुरीचे काम करीत होते. या कामावरच त्यांच्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालत होता. त्यांचा आठ वर्षाचा मुलगा मागील काही दिवसांपासून आजारी असल्यामुळे त्याच्या औषधोपरासाठी शिर्डी, नाशिक या ठिकाणी नेले होते. मात्र आजाराचे निदान लागलेच नाही. या औषधोपचारासाठी त्यांनी बचतगटाचे पैसे उचलले होते. मुलाचे आजारपण कमी होत नसल्याने त्याच्या उपचारासाठी वारंवार खर्च करावा लागत होता. त्यासाठी पैसे कसे उभे करायचे तसेच बचतगटाचे पैसे कसे फेडावे याची चिंता त्यांना लागली होती. दि ७ आक्टोबर रोजी ते बाहेर जाऊन येतो असे सांगून घराबाहेर पडले होते. त्यानंतर ते घरी परतलेच नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला नातेवाईकांकडे त्यांची माहीती मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात माहीती दिली. वसमत ग्रामीण पोलिस ठाण्याचे सपोनि अनिल काचमांडे यांच्यासह मधुकर आडे, विजयकुमार उपरे यांच्या पथकाने बेपत्ता मल्हारी यांचा शोध सुरू केला. यामध्ये त्यांचा मृतदेह गुंज शिवारात गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. याप्रकरणी बाळू वाहुळकर यांनी दिलेल्या माहीतीवरून वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद झाली आहे. पुढील तपास जमादार आडे हे करीत आहेत.

# सेनगाव पोलिसांकडून शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० आक्टोबर**



सेनगाव तालुक्यातील साखरा येथील आरोपी दीपक वैजनाथ चाकोते हा त्यांच्या राहत्या जागेच्या बाजूला मोकळ्या जागेत अवैधरित्या गुटखा विकताना आढळून आल्याने सेनगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक घारगे व पोलीस उपनिरीक्षक मारोती सोनकांबळे यांच्या पथकाने धाड टाकून त्यांच्याकडून ६५ हजार ५४६ मुद्देमाल जप्त करत त्यांच्याविरुद्ध सेनगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच्याकडून जप्त करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस उपअधीक्षक दळवे, सेनगाव पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कारवाईत सेनगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक घारगे, पोलीस उपनिरीक्षक मारोती सोनकांबळे, गोपनीय शाखेचे बीट अंमलदार ओमनाथ राठोड, बीट जमादार जाधव, यांच्या सह पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने छापा टाकून फिर्यादी सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक घाडगे यांच्या फिर्यादीवरून आरोपी दीपक वैजनाथ चाकोते वय ४५ वर्षे व्यवसाय पान टपरी चालक राहणार साखरा तालुका सेनगाव जिल्हा हिंगोली यांच्याविरुद्ध सेनगाव पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

# भाग्यनगर येथील विकासासाठी करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला - अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महापालिका झाल्यामुळे शहर विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध मिळू लागला असून भाग्यनगरच्या विकासासाठी आपण करोडो रुपयाचा निधी विविध विकास कामासाठी मा.मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस व अजित दादा पवार यांच्या माध्यमातून मंजूर करून घेतला आहे.

भाग्यनगरचा डीपी रोड व अण्णाभाऊ साठे पुतळा ते मुक्तेश्वर द्वारपर्यंतचा हा मुख्य रस्ता सीसी ट्रिमिक्स पद्धतीने बांधकाम व्हावे ,पुतळा ते मिसाळ टावर पर्यंतच्या भुमिगत नाला व सिमेंट रोड हवा अशी या भागाचे नगरसेवक लक्ष्मीकांत अण्णा पांगारकर, गोपीकिशन गोगडे,व रहिवासी नागरिकांची सततची मागणी होती. त्यांचा माझ्याकडे सततचा या कामासाठी पाठपुरा होता. त्यांच्या मागणीची दखल घेऊन मी मा. मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्याकडे पाठपुरावा केला व ही मागणी मंजूर करून घेतली. यासाठी अकरा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून हा रस्ता दर्जेदार होणार आहे. तसेच भाग्यनगरचा डीपी रोड साठी जिल्हा नियोजन समितीमधून चार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला. वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मधून अण्णाभाऊ साठे पुतळा ते मिसाळ टावर पर्यंतचा मोठा नाला व सिमेंट रस्ता बांधकामासाठी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला. आता या रस्त्याचे कामे झाल्यामुळे भाग्यनगरचा विकासामध्ये व सौंदर्यकारणामध्ये भर पडली असून या भागातून जाणारी जड वाहतुकी बद करून ईतर ठिकाणी वरून वळविण्या साठी प्रयत्न केले जातील असे वर्ष नाव पण येते तथा *माजी राज्यमंत्रीअर्जुनराव खोतकर यांनी मुक्तेश्वर द्वार ते अण्णाभाऊ साठे पर्यंत मुख्य रस्त्याचे सीसी रिमिक्स पद्धतीने बांधकाम भूमिपूजन प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले .याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे आज १० ऑक्टोंबर २०२४ रोजी अण्णाभाऊ साठे स्मारक ते मुक्तेश्वर प्रवेशद्वारे रस्त्याचे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी प्रथम अण्णाभाऊ साठे पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला व उद्योगरत्न पद्मभूषण रतनजी टाटा यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे , भाजपचे जिल्हा अध्यक्ष बद्रीनारायण पठाडे, भास्कर आबा दानवे, राजेश राऊत, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले, आत्मानंद भक्त, नगरसेवक गोपीकिसन गोगडे, लक्ष्मीकांत अण्णा पांगारकर, श्रीकांत शेलगावकर ,डॉक्टर प्रभू ,रवींद्र देशपांडे, प्रा. रावसाहेब ढवळे, शिवाजीराव गोंटे, भरतराव गव्हाणे , सौ कालींदाताई ढगे, शुभांगी देशपांडे, संतोषराव मोहिते,गणेश सुपारकर, पांडुरंग डोंगरे,एडवोकेट आसपाक पठाण , योगेश रत्नपारखे, कुणाल जाधव,अंकुशराव पाचफुले,जाफर खान, किशोर पांगरकर, ताहेर खान, रत्नमाला जाधव, फोपलीयाताई, मेघराज चौधरी ,सखाराम लंके ,भोला कांबळे, पिटर खंदारे, संताजी वाघमारे, राम सतकर, रामकिसन कांयदे, किरण शिरसाट, शुभम टेकाळे, अर्जुन गेही, किशोर शिंदे, संदीप साबळे, शरद ढाकणे ,संतोष शेलार कांतराव रांजणकर, राजू बाबरेकर, विश्वास भोरे, संदीप हिवराळे, सुशील भावसार, फुलंब्रीकर महाराज, सुमित पाटील, सोनू साळवे, संताजी वाघमारे, पंजाबराव जराड, सिद्धिविनायक मुळे, राज रत्नपारखे, दीपक राठोड, संतोष परळकर दाबके काका, बडेखान काका आदी मान्यवर उपस्थित होते.

## जालन्यासह सर्व तालुक्यांत सुसज्ज सांस्कृतिक सभागृहे उभारावी

### डॉ. संजीवनी तडेगांवकर यांची राज्यपालांकडे मागणी



तभा वृत्तसेवा

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याचे सांस्कृतिक वैभव असलेले मा.कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृह बकाल अवस्थेमुळे मागील दहा वर्षांपासून बंद असून कवी, साहित्यिक ,नाटककार ,कलावंतांची देन लाभलेल्या जालना शहरासह प्रत्येक तालुक्यात सांस्कृतिक सभागृह उभारावे अशी मागणी भावकवियत्री म.सा.प.च्या केंद्रीय कार्यकारिणी संचालिका डॉ.संजीवनी तडेगांवकर यांनी राज्यपालांकडे केली आहे.

जालना दौऱ्यावर आलेल्या राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी शासकीय विश्राम गृहात डॉ.संजीवनी तडेगांवकर यांच्या सोबत चर्चा, विचारविनिमय करून संवाद साधला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती होती. डॉ तडेगांवकर यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र आणि राज्य शासनाचे अभिनंदन करून राज्यपालांना दिलेल्या लेखी निवेदनात सांस्कृतिक सभागृहा अभावी कवी ,साहित्यिक, कलावंत, रसिक वर्गाची होत असलेली घुसमट राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिली. शासन स्तरावर पाठपुरावा करूनही सांस्कृतिक सभागृह उभारणीस यश आले नाही. येथील रसिकांची सांस्कृतिक भूक भागविण्यासाठी तसेच साहित्यिक, सांस्कृतिक उपक्रम, व्याख्याने याकरिता शासनाने सुसज्ज असे सांस्कृतिक सभागृह उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी डॉ. संजीवनी तडेगांवकर यांनी केली.

## संक्षिप्त वृत्त...

### माहोरा येथे छत्तीसगडचे आमदार कोमल सिंगजी जंघेल यांच्या उपस्थित भाजपा बुथ प्रमुखाची बैठक



**तभा वृत्तसेवा**

**माहोरा । प्रतिनिधी -** जाफ्राबाद तालुक्यांतील माहोरा येथील भाजपाचे जेष्ठ नेते भगवानराव लहाने यांच्या निवास स्थानी भाजपा बुथ प्रमुख,शक्ती प्रमुख, पन्नाप्रमख अतिशय तातडीची बैठक घेऊन छत्तीसगडचे माजी आमदार कोमलजी जंघेल यांनी प्रमुख कार्याक्रर्यासमोर विविध येणाणाऱ्या विधनसभा निवडणुक संदर्भत कार्यकर्त्याची बैठक आयोजित पर मार्गदर्शन श्री कोमल सिंगजी जंगेल यांनी भाजपा पक्षाचे हित व वोट कसे वाढेल,तसेच भाजपा कडे तो मतदार कसा वळेल व जे कोणी विरोधक भाजपाचे विनाकारण बदनामी करित असेल त्या ठिकाणी भाजपचे बुथ , प्रमुख, शक्ती प्रमुख, भाजपाच्या कार्यकार्याने खचुन न जाता जोमाने, निवडणुकीच्या काळात भाजपाच्या कार्यक्रर्याने जशास तसे उत्तर विरोधकांना द्यावे व भाजपाच्या बुथ प्रमुखाच्या सोबत माझी अनेक ठिकाणी बैठका होतात मात्र ज्या ठिकाणी भाजपाला मायनस, असेल त्या ठिकाणी भाजपा प्लस कशी होईल असे माजी आमदार कोमल सिंगजी जंघेल, यांनी बुथ प्रमुखाच्या बैठकीत मार्गदर्शन पर बोलतांना सांगितले. या वेळी माहोरा येथील सरपंच गजानन पा. लहाने, माजी व भाजपा तालुका अध्यक्ष नाना पा. भगिले,माजी कृ.ऊ.बा. सभापती भाऊसाहेब जाधव, माजी सभापती साहेबराव कानडजे, माजी सभापती दगडुबा गोरे डॉ.रविन्द्र कासोद,अन्ना, माजी सभापती चंद्रकांत चौतमोल, माजी उपसभापती सुधिर पाटील, डॉ. अशोक पंडित, जे.बी. जाधव, सागर पाटील लोखंडे, केशव मकवाने, विलास कोल्हे, नारायण वैद्य, सतिष पा. लोखंडे, शंकर पा. लहाने, विनायकराव लहाने, वामनराव लहाने, विजय बोराडे, संतोष गौवकर, बाळासाहेब गव्हले, संतोष वरपे, भिमराव दांडगे, कैलास पाटील लहाने, पवन लहाने, इतर भाजपाचे कार्यकर्ते अतिशय तातडीच्या बैठकीस उपस्थित होते. तसेच माहोरा येथील भाजपाते जनसंघाचे जेष्ठ नेते कार्यकर्त भगवनराव पा.लहाने, यांच्या संपुर्ण फॅमिली च्या सोबत बऱ्याच वेळ कोमलसिंगजी जंघेल यांनी चर्चा गप्पा मारल्या, व एक वेळेस छत्तीसगडला ला यावे व निवडणुकीत भाजपा कोमल जी विजय करण्याचा कार्यक्रर्याचा उत्सहा व मनोबल वाढवले असे शेवटी कोमलसिंगजी जंघेल यांनी सांगितले.

### मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या अर्जास मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**जालना । प्रतिनिधी-** राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरीकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी यांना अर्ज करण्यासाठी शासनाने दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. जिल्हयातील अर्ज न करणाऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई लवकरच मिळणार

# परतुर व मंठा तालुक्यासाठी मिळणार ८८.८९ कोटी रुपयांची नुकसान भरपाई - आ . बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**

**मंठा । प्रतिनिधी -** अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना अनुदान स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील मदत देण्यात येते. ऑगस्ट व सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व सदस्य पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई देखील लवकरच मिळेल अशी माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

केंद्र शासनाने विहित केलेल्या १२ नैसर्गिक आपत्तींव्यतिरिक्त राज्य शासनाने अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण व आकस्मिक आग या स्थानिक आपत्तींमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत देण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच शासन निर्णयान्वये सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती घोषित करण्यात आली आहे. त्यानुसार अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या व त्यापुढील कालावधीसाठी अवेळी पाऊस व गारपीट व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता सुधारित दराने २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत्त अनुज्ञेय करण्यात आली आहे. अशी माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

ऑगस्ट व सप्टेंबर, २०२४ या महिन्यात अतिवृष्टी, पूर किंवा सततचा पाऊस यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी संध्याकाळी मिळावी यासाठी आपण स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याशी पत्रव्यवहार करून व्यक्तीशः भेट घेऊन मागणी केलेली होती जिल्हाभरात ६ लाख ३८ हजार ७९७ एकर चे झाले नुकसान झालेले असून त्यासाठी सुमारे ४१२.३० कोटी रुपये नुकसान भरपाई ची मागणी करण्यात आली असून भरपूर व मंठा तालुक्यात झालेल्या नुकसान भरपाईसाठी ८८.८९ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली असल्याची माहिती लोणीकरांनी दिली.



महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार हे सर्वस्वी शेतकऱ्यांना समर्पित असे सरकार असून शेतकऱ्यांच्या अडीअडचणीच्या काळात खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहणारे सरकार आहे त्यामुळे मागील काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे किंवा सततच्या पावसामुळे जे नुकसान झाले असेल त्याची नुकसान भरपाई शासनामार्फत लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल असा विश्वास माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

मंठा तालुक्यातील ६१५३० तर परतुर तालुक्यातील ४५४५९ अशा एकूण १०६९८९ शेतकऱ्यांनी पिक विमा मिळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने तक्रार दाखल केली आहे तसेच तालुक्यातील १०७५४७ शेतकऱ्यांनी भरलेला असून त्यामध्ये ६६ हजार १३४ हेक्टर जमिनीचा पिक विमा काढण्यात आलेला आहे भरपूर तालुक्यातील ८४ हजार ५५२ शेतकऱ्यांनी ५४ हजार ४७० हेक्टर एवढा पिक विमा काढलेला आहे अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

## जालन्यातील महीला आयटीआय तात्काळ सुरू करण्याची आ. गोरंटयाल यांची राज्यपालांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**

**जालना । प्रतिनिधी -** मागील पंधरा वर्षापूर्वी जालना येथे महिलांसाठी मंजूर करण्यात आलेली औद्योगिक प्रशिक्षण संस्था अपेक्षित असलेल्या पदे आणि यंत्रसामुग्रीसह तात्काळ सुरू करावी अशी आग्रही मागणी आ. कैलास गोरंटयाल यांनी राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेऊन केली. दरम्यान, या बाबत सकारात्मक प्रतिसाद देत सदर संस्था कार्यान्वित करण्याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल अशी ग्वाही राज्यपालांनी यावेळी दिली.

जालना येथील नव्याने सुरू करण्यात आलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाचा शुभारंभ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. जालना येथील जिल्हा प्रशासकीय इमारतीमधील महसूल भवन मध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमानंतर जालन्याचे आ.कैलास गोरंटयाल यांनी राज्यपालांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. २६ जुन २००९ रोजी काढलेल्या एका शासन निर्णयाद्वारे राज्यातील महिलांसाठी २० नविन औद्योगीक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यास तत्वतः मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये जालना येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा



देखील समावेश आहे. मात्र, शासन निर्णय निघून आता तब्बल १५ वर्षांचा कालावधी उलटूनही जालना येथील महिलांसाठीची औद्योगीक प्रशिक्षण संस्था सुरु झालेली नाही ही अत्यंत खेदाची बाब असल्याचे आ. गोरंटयाल यांनी या निवेदनात म्हटले आहे. सदर प्रशिक्षण संस्थेला मंजुरी दिल्यानंतर प्रशिक्षणासाठी लागणारी तांत्रिक पद भरती, लिपीकवर्गीय पदभरती तसेच त्यांना शिकविण्यासाठी लागणारी यंत्र सामुग्री व साधन सामुग्री या बाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने अद्याप महिलांसाठीची औद्योगीक प्रशिक्षण संस्था सुरू झाली नसल्याचे निदर्शनास आणून देत १५ वर्षापुर्वी मंजुर असलेली महिला औद्योगीक प्रशिक्षण संस्था तात्काळ सुरू करावी अशी मागणी आ. गोरंटयाल यांनी राज्यपालांना दिलेल्या या निवेदनात केली आहे. यावेळी आ. राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती होती.

## घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते रखडले

### अनेक बांधकामे बंद !



**तभा वृत्तसेवा**

**भोकरदन । प्रतिनिधी -** शासनाच्या पंतप्रधान आवास व रमाई आवास घरकुल योजनेचा तालुक्यातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात लाभ होत असून या योजनेमुळे गरीबांना घरे बांधण्यास शासनाकडून मोठे अर्थसहाय्य देण्यात येत आहे. यातून गरिबांचे घराचे स्वप्न पुर्ण होत आहे, परंतु भोकरदन तालुका याला अपवाद ठरत आहे. तालुक्यासह शहरातील अनेक घरकुल बांधकामे हप्ता वेळेवर जमा होत नसल्याने बंद पडली आहेत, यामुळे घरकुल योजनेचे हप्ते त्वरित वितरित करावे अशी मागणी लाभार्थी प्रशासनाकडे करत आहेत. परंतु प्रशासनात घरकुल संबंधी उदासीनता दिसून येत आहे. यामुळे अनेकांचे घराचे स्वप्न तुर्त लांबले आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, शहरातील विविध भागात शासनाकडून घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. यात अनेक लाभार्थींनी स्वतः चा पैसा खर्च करुन घराचे बांधकामे सुरू केली परंतु लाभार्थ्यांना सुरळीत हप्ते मिळत नसल्याने अनेक बांधकामे अर्धवट बांधलेल्या अवस्थेत पडून आहेत. याविषयी लाभार्थी संबंधित कार्यालयात घरकुल हप्त्याबाबत चौकशी करण्यासाठी गेले असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहे. यामुळे लाभार्थींचा हिरमोड होतो आहे. एकीकडे शासन स्तरावर योजनेसाठी लाखोंचा निधी खर्च केला जात असताना प्रशासनाच्या उदासीनतेमुळे गरिबांच्या घराचे स्वप्न अधांतरी तरंगत आहे. दरम्यान या प्रकरणी स्वतः जिल्हाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून घरकुल लाभार्थ्यांचे ताटकळलले हफ्ते वितरित करण्यासाठी अधिकाऱ्यांना आदेश देण्याची मागणी लाभार्थी करित आहेत.

## आमदार संतोष पाटील दानवे यांच्या पाठपुराव्यामुळे जाफ्राबाद शहरात सुसज्ज बस स्थानक पुनर्बांधणीसाठी ७ कोटी रुपये मंजूर

**तभा वृत्तसेवा**

**जाफराबाद । प्रतिनिधी -** कित्येक दिवसापासून तालुक्यातील प्रवाशांसह सर्व नागरिकांची मागणी होती की आपण या भागाचे एक संवेदनशील, आणि विकासाला प्राधान्य देणारे लोकप्रतिनिधी आहात ज्या पद्धतीने आपण रस्ते,वीज,पाणी या क्षेत्रामध्ये भरीव काम केले आहे आणि जाफ्राबाद शहरासाठी अंतर्गत सिमेंट रस्ते,हिंदु समाज बांधवांसाठी स्मशानभूमी आणि मुस्लिम बांधवांसाठी कब्रस्तान व शादीखान्यासाठी राज्य शासनाकडून भरघोस निधी उपलब्ध करून दिला त्याच पद्धतीने जाफ्राबाद शहरात असलेल्या बस स्थानक बांधकामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा आणि एक सुसज्ज बस स्थानक उभारावे अशी विनंती स्थानिक नागरिकांनी केली.

ही मागणी आमदार संतोष पाटील दानवे यांनी गांभीर्याने घेऊन आणि जाफ्राबाद बस स्थानकाची गेल्या काही दिवसापासून मोठी दुरावस्था झाली होती त्यामुळे प्रवाशांची गैरसोय पाहता आमदार संतोष पाटील दानवे यांनी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे साहेब यांच्या मदतीने राज्य शासनाकडे पाठपुरावा केला आणि अखेर आमदार संतोष पाटील दानवे यांच्या पाठपुराव्याला यश येऊन जाफ्राबाद शहराच्या सौंदर्यात आणखी एक भर पडली आणि जाफ्राबाद येथील बस स्थानकासाठी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे आणि आमदार संतोष पाटील दानवे यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री माननीय श्री.एकनाथ शिंदे साहेब, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि परिवहन मंत्री यांच्या माध्यमातून बस स्थानक बांधकामासाठी ०७ कोटी रुपये निधी मंजूर केला आहे.

या सुसज्ज बस स्थानक पुनर्बांधणी मध्ये तळमजला,पहिला मजला,सदनिका इमारत,पाणी पुरवठा व सांडपाण्याची व्यवस्था,फायर फायटिंग,संरक्षण भिंत बांधकाम,वाहनतळ या सर्व घटकांचा समावेश आहे.

आता लवकरच निविदा प्रक्रिया राबवून या निधीतून जाफ्राबाद बस स्थानकाचे रुपडे पालटणार आहे.यामुळे जाफ्राबाद आगारातून लांब पल्याच्या गाड्या सुरु करण्यास वाव मिळेल आणि जाफ्राबाद सह परिसरातील प्रवाशांनाही सोयी-सुविधा उपलब्ध होणार असल्याचे आमदार संतोष पाटील दानवे यांनी नमूद केले आहे.

हा निधी मंजूर केल्याबद्दल प्रवाशांसह



सर्व नागरिक आमदार संतोष पाटील दानवे यांचे आभार व्यक्त करीत आहे.



**रावण दहन नियोजनाची दसरा महोत्सव समितीच्यावतीने पाहणी करण्यात आली. यावेळी समितीचे अध्यक्ष राजेश कामड, स्वागत मंत्री विजय राठी, कार्याध्यक्ष दिलीप शाह, उमेश अग्रवाल, संगठन मंत्री मनिष तवरावाला, सचिव ड. ईश्वर बिल्होरे आदी दिसत आहेत.**

# उमरज येथे रस्त्याच्या विकास कामाचे आज भूमिपूजन

## माजी खासदार चिखलीकर यांच्या पुढाकारातून ३० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, दि.१० ऑक्टोबर**

कंधार - लोहा विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील रस्ते अधिकाधिक मजबूत करत दळणवळणाची साधने वाढवून या भागाचा शाश्वत विकास करण्याच्या अनुषंगाने माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकारातून तब्बल ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून या मंजूर निधीतील रस्ते विकासाचे भूमिपूजन शुक्रवार दिनांक ११ ऑक्टोबर रोजी दुपारी चार वाजता उमरज येथे करण्यात येणार आहे. उमरज मट संस्थानचे श्री संत महंत एकनाथ गुरु नामदेव महाराज उमरजकर यांच्या विशेष उपस्थितीत माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते हा भूमिपूजन सोहळा पार पडणार आहे.



माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली लोहा -कंधार विधानसभा मतदारसंघात विकासाची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. या भागाच्या शाश्वत आणि सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या चिखलीकर यांनी रस्ते विकासासाठी तब्बल ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे .यात माळाकोळी-वागदरवाडी-चोंडी प्रमुख जिल्हा मार्ग, दगड सांगवी-उमरज राज्यमार्ग , तळ्याची वाडी या रस्त्यांचा विकास करण्यात येणार आहे. यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर रोजी उमरज येथे भूमिपूजन सोहळा पार पडणार आहे. या भूमिपूजन

सोहळ्याला भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर संतुकराव हंबर्डे, एडवोकेट किशोर देशमुख, भाजपाचे नांदेड महानगर अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, भाजपाच्या महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष सौ. प्रणिताताई देवरे -चखलीकर, प्रदेश उपाध्यक्ष देविदास राठोड, जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, प्रदेश कार्यकारणी सदस्य बाबुराव केंद्रे यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख, माजी नगराध्यक्ष अनुसयाताई केंद्रे, सौ. चित्ररेखाताई गोरे, जाफरोदिन बहोद्दीन, भगवानराव राठोड, प्रभाकरराव केंद्रे, मनोहर तेलंग, बाबुराव गिरे, सचिन पाटील चिखलीकर, कालिदास गंगावरे, बालाजीराव चुकलवाड, बालाजी गर्जे, दत्तात्रेय चंदनफुले, श्रीराम जाधव, जयमंगला औरादकर, गंगाप्रसाद यनावार, मधुकरराव डांगे, विनोद तोरणे, साईनाथ पाटील कपाळे, शेख असिफ, निलेश गौर, कैलास नवघरे, डॉक्टर संजय केंद्रे, सौ शोभाताई संगनवार , रामराव घोरपडे, शंतनु कैलासे, बाबुराव चाटे, सागर डोंगरजकर, सौ. जयश्रीताई केंद्रे, प्रदीपराव फाजगे, राजेश मुंडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती राहणार आहे.

# ग्रामीण पोलिसांनी केला सव्वालाखाचा गुटखा जप्त



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१० ऑक्टोबर**

ग्रामीण पोलीसांच्या पथकाने कौठा येथील एकाच्या घरी छापा मारून १ लाख १८ हजार ७३२ रूपयांचा गुटखा जप्त केला. ही कारवाई दि. ८ ऑक्टोंबर रोजी करण्यात आली.

ग्रामीण पोलीसांचे पथक दि. ८ ऑक्टोंबर रोजी गस्त घालत असतांना कौठा परिसरात एकाच्या घरी गुटखा असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावरून पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या पथकाने कौठा येथील ओमकार इंग्लिश स्कुलच्या पाठीमागील किशोर प्रल्हादराव देशमुख यांच्या घरी छापा मारला. या कारवाईत पोलीसांनी राजनिवास, विमल, मुस्साफीर, रजनिगंधा, सिग्नीचर, वजिर आदी पान मसाल्यासह सुगंधीत जर्दा जप्त केला. या कारवाईत पोलीसांनी १ लाख १८ हजार ७३२ रूपयांचा गुटखा जप्त केला असून किशोर देशमुख व अजिम यांच्या विरूध्दात ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरिक्षक महेश कोरे, पोलीस अमलदार सत्तार शेख, संतोष जाधव, विक्रम वाकडे, मारोती पचलींग, असिफ शेख, माधव माने, शंकर माळगे, ज्ञानेश्वर कलंदर, सुनिल गटलेवार, शिवानंद तेजबंद यांच्या पथकाने केली.

# ओबीसी समाजामुळे हदगाव मतदारसंघाचे राजकीय चित्र बदलणार: प्रा. हाके

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि.१० ऑक्टोबर**

हदगाव येथे दि. ०९ ऑक्टोबर रोजी ओबीसी आरक्षण बचाव बैठकीसाठी लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची जाहीर सभा राष्ट्रीय क्लब येथे घेण्यात आली.

यावेळी लक्ष्मण हाके म्हणाले की हदगांव मतदार संघातील ओबीसी समाज एकत्र आला तर जुने चार घराण्याचे राजकारण संपुष्टात आल्याशिवाय राहणार नाही. ओबीसी समाजाला आरक्षण हे सन्मानाने जगण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली आहे. आरक्षण हे गरिबी हटाव कार्यक्रम नसून गावगाड्यातील दऱ्याखोऱ्यातील वाडी वस्त्यावरील जे जमात आजपर्यंत मुख्य प्रवाहात आली नाही, त्या जाती जमाती वाड्या वस्तीतील लोकांना मुख्य प्रवाहात आणून त्यांना सन्मानाने जगण्यासाठी व आपला हक्क न्याय मागण्यासाठी आरक्षण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ओबीसी समाजाला दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या कलम ३४० कलमामध्ये सर्वप्रथम ओबीसी समाजाचा विचार करून या समाजाला आरक्षण दिले.

नंतर ३४१ एसटी आणि ३४२ एससी यांचा अर्थ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ओबीसी समाजाला सर्वप्रथम आरक्षण दिले होते. त्या आरक्षणामध्ये आता इतर समाजाने घुसण्याचा प्रयत्न करू नये. प्राध्यापक लक्ष्मण हाके म्हणाले की, हदगांव विधानसभा मतदारसंघात आजपर्यंतचा इतिहास पाहता चार घराण्यानेच या मतदारसंघावर अधिराज्य गाजवले आहे. त्यात जवळगांवकर, आष्टीकर, सूर्यकांता ताई, व सुभाष वानखेडे असे हे चार घराणेच आजपर्यंत मतदारसंघावर वर्चस्व ठेवून आहेत. पण यावेळेस ओबीसी समाज एकत्रित आला तर इतिहास घडणार व या व्यासपीठावर आहेत त्यापैकी एक आमदार होणार असे छाती ठोकपणे या सभेत सांगतो. हदगाव तालुक्यातील कवाना येथे दत्ता अनंतवार यांनी ११ दिवस ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी उपोषण केले. त्यावेळेस आमदार जवळगावकर व खासदार नागेश पाटील आष्टीकर त्यांच्या उपोषणाला भेट न देता सरळ जरांगे यांच्या सभेसाठी रवाना झाले. व त्यांना समर्थन केले. त्यामुळे ओबीसी समाजाला आता तुम्ही गृहीत धरू नये. असा टोला सुद्धा प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी लगावला.

या कार्यक्रमाला बालाजी खर्डे पाटील, निळू पाटुील, राजेश फुलारे, कैलास राठोड, जीवन आडे, जाकीर चाऊस, दिलीप राठोड, संजय कांबळे, कैलास राठोड, विलास महाजन व अनेक ओबीसी समाजातील नेते उपस्थित होते.

# श्री युवा एकता दुर्गामाता नवरात्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१० ऑक्टोबर**

नांदेड येथील कैलास नगर परिसरात असणाऱ्या श्री युवा एकता दुर्गामाता नवरात्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये १११ रक्तदात्यानी रक्तदान केले . यावेळी माजी नगरसेविका वैशालीताई मिलिंद देशमुख, भाजपा महानगर सरचिटणीस साहेबराव गायकवाड, मा. नगरसेविका



अपर्णाताई नेरलकर, आनंद पावडे, हिरामण देसाई, दत्ता भोसले, प्रदीप सरोदे, आबाजी पावडे, शंतरका पांढरे, यांच्या मंडळाचे शिवा नागरगोजे, श्रीधर गायकवाड, विशाल साबणे, आकाश सावंत, सुरेश जमदाडे, आशिष भवरे, पवन कोळ्नुरे, विश्वजीत साबणे, सोहन टोम्पे, आदित्य कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## सोयाबीनची खरेदी सुरू करा

**नांदेड** -सध्या सोयाबीनचा हंगाम सुरू झाला असून शेतकऱ्याकडे आलेली सोयाबीन ४००० च्या आसपास विक्री करावी लागत आहे. शासनाने ४८०० रुपये हमी दर जाहीर केला. परंतु खरेदी सुरू केली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. नाफेड व पणनमार्फत त्वरित खरेदी सुरू करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव शिंदे यांनी केली आहे.

**SHRI GURU GOBIND SINGHJI INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY, VISHNUPURI, NANDED-431606 (M.S.)**

First Extension 2nd Call

Please Refer our E-Tender inviting notice published in Udyacha Maratjwada on dated 13/09/2024 for Green Audit of SGGSIE&T, Vishnupuri ,Nanded vide online tender no. 2024_DTEDM_1082779_1

Due to in sufficient bids, E-Tender submission duration has been extended upto 23/10/2024. This first extension consider as second call. The tenders area available on portal https://mahatenders.gov.in/nicgep/app

**DIRECTOR**

## उमरी नगर परिषद उमरी ता.उमरी जि. नांदेड

**ई-निविदा सुचना क्रमांक (१४) सन २०२४-२५ (पहिली वेळ)**

जा.क्र. उनप/२०२४ | दिनांक १०/१०/२०२४

**जिल्हा वार्षिक योजना- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत**

उमरी नगर परिषद उमरी जिल्हा नांदेड करीता मुख्याधिकारी नगर परिषद उमरी यांचे कडुन बांधकाम विभाग अंतर्गत योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ब-१ नमुण्यातील निविदा पहिल्यांदा ई-निविदा प्रणालीव्दारे मागवित आहेत.

**टिप:-** वरील निविदे मध्ये (०१) काम समाविष्ट असुन कामाची संपूर्ण माहीती खालील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

https://www.mahatenders.gov.in

**स्वा/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद उमरी जि. नांदेड**

## वसतिगृह अधिक्षक शंकर कुडके यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि.१० ऑक्टोबर**



बिलोली येथील संस्कृति संवर्धन मंडळ सैनिकी विद्यालयातील वसतिगृह अधिक्षक शंकर कुडके यांचे आज दि. १० ऑक्टोबर रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. संस्कृति संवर्धन मंडळ संस्था परिवारात दाखल झाले. नम्र, शांत व संयमी स्वभाव, मितभाषी हे गुण असलेले शंकर कुडके विद्यार्थ्यांसह सहकाऱ्यांत लवकर रुळले. प्रभावी वकृत्व, कल्पकता, गटात काम करण्याचे कसब, सर्वसमावेशक वृत्ती यातून ते सर्वांच्या अधिकच जवळचे बनले होते. शंकर कुडके यांना मागील दोन महिन्यापासून हृदयविकाराचा त्रास सुरु होता. आज दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. दैनिक तरुण भारतचे तालुका प्रतिनिधी गंगाधर कुडके यांचे ते लहान बंधू होत.







